NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १४६ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. १८ जुलै, २०२२ सकाळी ११:०० वा.

**प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४६ वी बैठक सोमवार, दि. १८ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११:०० वा.** व्यवस्थापन सभागृहामध्ये मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. वि. बा. पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. पां. शिखरे | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | ॲड. श्रीमती नी. सु. मंकणी | सदस्या |
| ९) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १०) | डॉ. ता. ना. काळेकर | सदस्य |
| ११) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| १२) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १३) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १४) | डॉ. सु. कि. पवार - प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

स्वागत:

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अभिनंदन:

आंतरराष्ट्रीय पातळीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरिता "Summit of Leaders, Oxford" The Academic Union, Oxford, UK परिसंवादाकरिता मा. कुलगुरु यांना निमंत्रित केल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन करण्यात आले.

आभार:

प्रा.डॉ. वि.भा.घुटे, संचालक- संगणकशास्त्र संकुल यांनी व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून योगदान दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

अनुपस्थिती:

डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ १. दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४३ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

२. दि. ०७ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

३. दि. १३ जुलै, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४५ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

प्र. कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०७ मार्च, २०२२ रोजी झालेल्या १४४ व्या व दि. १३ जुलै, २०२२ रोजी झालेल्या १४५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<table>
<tr><td>ठराव</td><td>१. दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४३ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि. १३ जुलै, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली<br>३. दि. ०७ मार्च, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.</td></tr>
<tr><td></td><td>• पान क्र. ०४ व ०५ वरील विषय क्र. १ मध्ये ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.</td></tr>
<tr><td></td><td>पूर्वीचा ठराव</td></tr>
<tr><td></td><td>महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल स्विकारुन, सेवाज्येष्ठता यादी तयार करणेकामी मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. ४ मध्ये खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>४. सेवाज्येष्ठता यादी तयार करताना गट ड मधील पदावर -<br>अ) कर्मचारी समान स्तरावर (Tie) होत असतील तर खालील कार्यपध्दती अवलंबावी:<br>(i) रुजू दिनांक व रुजू वेळ विचारात घ्यावी.<br>(ii) संबंधित भरती वर्षातील निवड परीक्षेचे एकूण प्राप्त गुण विचारात घ्यावी.<br>(iii) तद्नंतर वयज्येष्ठता विचारात घ्यावी.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | आ) सर्व पदनामांची भरतीसाठीच्या निवड परिक्षेचे एकुण गुण एकसमान असाव्यात, विविक्षित ठीकाणी ते एकसमान करण्यासाठी रुपांतरीत करुन घेण्यात यावीत.<br>• अनुकंपा / लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार अथवा अन्य माध्यमातून नियुक्ती झाली असल्यास-<br>अ) त्या सेवकाचा रुजु झाल्याचा दिनांक तद्नंतर वय ज्येष्ठता आणि शैक्षणिक पातळी अशा क्रमाने प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.<br>• सेवाज्येष्ठता यादी तयार करत असताना प्रस्तुत विद्यापीठासाठी लागू झालेला २०१० चा आकृतीबंद व सध्या लागू असलेले शासन निर्णय विचारात घ्यावे. |
| | **दुरुस्त केलेला ठराव** |
| | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल स्विकारुन, सेवाज्येष्ठता यादी तयार करणेकामी मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. ४ मध्ये खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>अ) गट 'ड' ची सेवाजेष्ठता यादी एकत्र करताना समितीने दिलेल्या खालील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा:<br>(i) संबंधित भरती वर्षातील निवड परीक्षेचे एकूण प्राप्त गुण विचारात घ्यावेत.<br>(ii) तद्नंतर वयज्येष्ठता विचारात घ्यावी.<br>आ) सर्व पदनामांची भरतीसाठीच्या निवड परीक्षेचे एकुण गुण एकसमान असाव्यात, विविक्षित ठिकाणी ते एकसमान करण्यासाठी रुपांतरीत करुन घेण्यात यावीत.<br>• अनुकंपा / लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार अथवा अन्य माध्यमातून नियुक्ती झाली असल्यास-<br>(i) त्या सेवकाचा रुजु झाल्याचा दिनांक तद्नंतर वय ज्येष्ठता आणि शैक्षणिक पातळी अशा क्रमाने प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.<br>• सेवाज्येष्ठता यादी तयार करत असताना प्रस्तुत विद्यापीठासाठी लागू झालेला दि. १९ सप्टेंबर, २००९ च्या शासन निर्णयान्वये लागू झालेला २१० पदांचा आकृतीबंध व सध्या लागू असलेले शासन निर्णय विचारात घ्यावे. |

विषय क्र.२ Quick Heal foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करारास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव.

(टिपणी: Quick Heal foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२१-२२ ते २०२२-२३ या कालावधी मध्ये सामंजस्य करार झालेला होता. सदरच्या करारामध्ये QHF तर्फे खालील उपक्रम राबविण्यात आले होते.

१. Online Course on Cyber Security Awareness
२. Earn & Learn Scheme for Students
३. Faculty Development Programme
४. Web Portal (Regular / Impact Partner)

Earn & Learn Scheme उपक्रमाअंतर्गत संगणकशास्त्र संकुलातील ८३ विद्यार्थ्यांनी २९३ शाळा व महाविद्यायलात जाऊन रु.१,२४,७७३/- विद्यार्थ्यांना Cyber Security Awareness या विषयावर व्याख्यान दिले. या मोबदल्यात QHF कडून ८३ विद्यार्थ्यांना रु. ६,३३,१००/- इतके मानधन मिळाले.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी अशाच प्रकारचा सामंजस्य करार करण्याबाबत QHF, पुणे यांच्याकडून दि.२०/०४/२०२२ रोजी प्राप्त झालेल्या कराराच्या मसुद्यास मा. कुलगुरु महोदयांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सबब, Quick Heal foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करारास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **Quick Heal foundation, Pune (QHF) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य कराराबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.३ Fantansy Technologies, Solapur व संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करारास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव.

(टिपणी: Fantansy Technologies, Solapur व संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्याची बाब व सामंजस्य करारास दि.१६/०३/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, Fantansy Technologies, Solapur व संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करारास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) च्या तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव).

| ठराव : | Fantansy Technologies, Solapur व संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य कराराबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

**विषय क्र.४ आरोग्य विज्ञान संकुलामार्फत डी. एस. टी. एस. मंडळ याचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर यांच्यासोबत शैक्षणिक सहचर्य करार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) च्या तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुला मार्फत डी. एस. टी. एस. मंडळ यांचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु यांनी दि.१४/१२/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर शैक्षणिक सहचर्य कराराच्या मसुद्यास दि.१४/१२/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता घेतलेली होती. व सदर मान्यतेच्या अधीन राहून डी. एस. टी. एस. मंडळ याचे कॉलेज ऑक फार्मसी, सोलापूर यांच्याशी आरोग्य विज्ञान संकुलाने शैक्षणिक सहचर्य करार केलेले आहे. सदर शैक्षणिक सहचर्य कराराचा फायदा विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | शैक्षणिक सहचर्य करारलागु झाल्याची तारीख |
|---|---|---|
| ०१ | डी.एस.टी.एस. मंडळ यांचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर | ०३-०१-२०२२ |

सबब, आरोग्य विज्ञान संकुलामार्फत डी. एस. टी. एस. मंडळ याचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर यांच्यासोबत शैक्षणिक सहचर्य करार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) च्या तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली असून सदरच्या कराराचा मसुदा व कराराची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **आरोग्य विज्ञान संकुलामार्फत डी. एस. टी. एस. मंडळ याचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर यांच्यासोबत शैक्षणिक सहचर्य कराराबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

**विषय क्र.५ विद्यापीठ वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो व एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिका ही दोन वाहने जाहिर लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो सी एस व एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिगो ही दोन वाहने दुरूस्तीसाठी जास्त खर्च काढत असल्यामुळे मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्याकडून बाजारमूल्ये घेऊन दि. १९/०९/२०२१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विक्रीसाठी विषय सादर केला असता सदर व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ मालकीचे वाहन क्र. एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो सी एस व वाहन क्र. एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिका युरो ही दोन वाहने लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्यास मान्यता देण्यात आली असा विषय क्र. ११ (९) प्रमाणे ठराव केला आहे.

या ठरावाप्रमाणे सदरची दोन वाहने लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्यासाठी २ वेळा प्रक्रिया करून देखील या वाहनांची विक्री होऊ शकली नाही. त्यामुळे पुनःश्च नव्याने प्रक्रिया करण्यासाठी मा. उपप्रादेशिक परिवहन यांच्या कार्यालयाकडून नव्याने चालू बाजारभावमूल्य घेण्यात आले. त्यानुसार मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांनी वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो या वाहनासाठी रु. ५५,०००/- व वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिगो या वाहनासाठी रु. ४०,०००/- इतकी बाजारभाव किंमत काढून देण्यात आली होती.

मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेकडून उक्त वाहनांच्या काढून देण्यात आलेल्या बाजारभाव किंमतीप्रमाणे दि.२८/१२/२०२१ रोजी दु.४.०० वा. विद्यापीठ परिसरात जाहीर लिलाव पुकारण्यात आला. मात्र वाहन विक्री किंमतीवर जी. एस. टी. भरावा की, नाही याबाबत उल्लेख नसल्यामुळे सदरची प्रक्रिया रदद करण्यात आली.

तद्नंतर दि.१७/०२/२०२२ रोजी दु.४.०० वा. विद्यापीठ परिसरात जाहिर लिलाव पुकारण्यात आला. या लिलावामध्ये श्री. रविंद्र सिद्राम कांबळे यांनी वाहन क्र. एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो हे वाहन १८ % जी. एस. टी. सहित एकूण रक्कम रु.१,१८,०००/- (अक्षरी एक लाख अठरा हजार रुपये फक्त) किमतीला व वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिका हे वाहन १८ % जी. एस. टी. सहित एकूण रु.८९,०९०/- (अक्षरी एकोणनव्वद हजार नव्वद रुपये फक्त) किंमतीला खरेदी केली आहेत.

वाहन खरेदीदारक श्री. रविंद्र सिद्राम कांबळे यांना सदरची दोन्ही वाहने कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे नावावरून श्री. रविंद्र सिद्राम कांबळे यांचे नावावर हस्तांतरित होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या २९ व ३० नंबरच्या फॉर्मवर मा. कुलसचिव यांची स्वाक्षरी घेऊन देण्यात आले. त्यासोबतच दोन्ही वाहनांचे ओरिजनल आर. सी. बुक., ओरिजनल पी. यु. सी., ओरिजनल इन्शुरन्स व ना- हरकत प्रमाणपत्रही देण्यात आले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★

वाहन खरेदीदारक श्री. रविंद्र सिद्राम कांबळे यांनी या दोन्ही वाहनांचे २९ व ३० नंबर फॉर्मच्या व मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचे कार्यालयाकडे चलन भरल्याच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती या कार्यालयाकडे दि.२४/०२/२०२२ रोजी हस्तपोहोच जमा केल्यानंतर विद्यापीठ कार्यालयीन पत्र जा. क्र.१३७५ दि.२५/०२/२०२२ अन्वये ही दोन्ही वाहने मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेकडून आपल्या नावावर करून घेण्याची तसेच या दोन्ही वाहनांचा दि.२५/०२/२०२२ रोजीपासून आपणास ताबा देण्यात आला असल्यामुळे या दिवसापासून सदर दोन्ही वाहना संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल या अटीवर श्री. रविंद्र सिद्राम कांबळे यांना हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

सबब, विद्यापीठ वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो व वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिगो ही दोन वाहने जाहिर लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री केल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठ वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ५४४६ टाटा इंडिगो व वाहन क्रमांक एम एच १३ ए सी ६७३५ टाटा इंडिगो ही दोन वाहने जाहिर लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री केल्याची नोंद घेण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ता. ना. कोळेकर, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी खालील कारणांसाठी भिन्न (Dissent) मताची नोंद केली.<br>आर्थिक वर्ष २०१९ मध्ये मान्यता घेतलेली आहे. त्याची कार्यवाही २०२२ मध्ये झालेली आहे. त्याच आर्थिक वर्षामध्ये कार्यवाही झालेली नाही. |

**विषय क्र.६ कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या दि.२८/०२/२०२२ रोजीच्या झालेल्या २४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: ज्ञानस्रोत समितीची दि.२८/०२/२०२२ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीतील विषय पत्रिकेवर ज्ञानस्रोत केंद्राचे नामकरण करण्यात येऊन कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र असे करण्यात येऊन सर्व कार्यालयीन कामकाजातील सर्व शिक्के देखील बदलण्यात आल्याची बाब, ज्ञानस्रोत केंद्राकडून विद्यार्थ्यांना जे ओळखपत्र दिले जाते. त्याची खरेदी करण्यात येऊन त्या फर्मसोबत वार्षिक दरकरार करण्यात आला असल्याची बाब, ज्ञानस्रोत केंद्रात प्रबंध व शोधनिबंध तपासण्याकरिता Turnitine Plagiarism Software खरेदी करण्यात येऊन त्याचा वापराकरिता तयार केलेली नियमावली व त्या मधून Plagiarism तपासून देत असल्याची बाब, नॅशनल डिजिटल लायब्ररी या प्रकल्यामध्ये ज्ञानस्रोत केंद्राचे रजिस्ट्रेशन केल्याची बाब, इ. विषय माहितीस्तव होते.

तसेच ज्ञानस्रोंत केंद्रांची मोबाईल ॲप तयार करण्याची बाब, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची दि. ४ फेब्रुवारी रोजी जयंती असते. या दिनाच्या प्रित्यर्थ दि. ४ फेब्रुवारी, २०२३ पासून प्रस्तुत विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राकडून सर्व शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनींकरिता उपक्रम राबविण्याची बाब इ. विषय विचारार्थ होते. ज्ञानस्रोत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ९६ (३) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव ठेवणे आवश्यक आहे.

सबब, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या दि.२८/०२/२०२२ रोजीच्या झालेल्या २४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

| ठराव : | **कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या दि.२८/०२/२०२२ रोजीच्या झालेल्या २४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र.७ सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली, लातूर यांना रू.४,७६,०००/- इतकी रक्कम २०२२-२३ या वर्षासाठी अमानत म्हणून देण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: विद्यापीठ स्थापने पासून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणा-या महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांचा विमा उतरविण्याची कायर्वाही विद्यार्थी विकास विभागाकडून करण्यात येते. निविदेत नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थी महाविद्यालयात व विद्यापीठात प्रवेश घेतल्या दिवसापासून पुढे एक वर्षे अपघात विमा सुरक्षा लागू राहील या अटीसाठी मा. कुलगुरु यांच्या कडून त्रिसदस्यीय समितीचे नामनिर्देशन करण्यात आले होते. सदर समितीने खालील प्रमाणे शिफारस केली होती.

विद्यापीठ व सर्व संलग्न महाविद्यालयांची एकुण विद्यार्थी संख्या ७०,००० इतकी गृहीत धरल्यास ७०,००० x प्रिमीयमची रक्कम रू. ६८/- = ४७,६०,०००/-अंदाजे इतकी होते. सदर रक्कमे पैकी १० टक्के रक्कम रू.४,७६,०००/-तसलमात म्हणून विमा कंपनीस देण्याबाबत विद्यापीठाच्या अधिकार मंडळात मान्यता घेण्यात यावी.

उपरोक्त शिफारशी नूसार सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक होते. परंतू आगामी व्यवस्थापन परिषदेची बैठक उशीरा होणार असून सन २०२२-२३ या वर्षातील महाविद्यालयाचे प्रवेश सुरू झालेले आसल्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयात व विद्यापीठात प्रवेश घेतल्याबरोबर त्याच दिवसापासून पुढे एक वर्षे अपघात विमा सुरक्षा लागू करण्यासाठी २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांना रू.४,७६,०००/-इतकी रक्कम अदा करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली असून त्यानूसार टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., यांना रू ४,७६,०००/- तसलमात म्हणून अदा करण्यात आले आहेत.

सबब, सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांना रू.४,७६,०००/-इतकी रक्कम २०२२-२३ या वर्षासाठी अमानत म्हणून देण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली, लातूर यांना रू.४,७६,०००/- (चार लाख श्याहत्तर हजार फक्त) इतकी रक्कम २०२२-२३ या वर्षासाठी अमानत म्हणून देण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.८ सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांच्याशी करण्यात येणाऱ्या सामजस्य कराराबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ स्थापने पासून विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांचा विमा उतरविण्याची कार्यवाही विद्यार्थी विकास विभागाकडून करण्यात येते. सदर योजनेत विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास रू.१०,००,०००/-इतकी रक्कम विमा कार्यालयाकडून अदा करण्याबाबत तसेच शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वारसदारास रू.२०,००,०००/- इतकी रक्कम विमा मिळण्यासाठी आय. आर. डी. ए. मान्यता प्राप्त विमा कंपनीकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांचे दर विद्यार्थ्यासाठी रू. ६८/- तर कर्मचारी याच्यासाठी रू.१३७/- इतके दर मान्य करण्यात आले असून, सन २०२२-२३ या वर्षात विद्यापीठ व महविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. एच. एस. सी. बोर्ड परीक्षांचा निकाल लागला असून पदवीच्या प्रथम वर्षासाठी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीया सुरू होण्या अगोदर महाविद्यालयांना विमा प्रिमीयमच्या रक्कमेबाबत अवगत करणे आवश्यक होते. कराराचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक होते. परंतू आगामी व्यवस्थापन परिषदेची बैठक उशीरा होणार असल्यामुळे विमा कंपनीशी करण्यात येणा-या सामजस्य कराराच्या मसुद्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली असून त्यानूसार विमा कंपनी सोबत करार करण्यात येवून सर्व संलग्न महाविद्यालयांना विमाबाबत कळविण्यात आले आहे.

सबब, सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांच्याशी करण्यात येणाऱ्या सामजस्य कराराबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **सन २०२२-२३ या वर्षासाठी सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्या अपघाती विमाबाबत टाटा एआय जी जनरल इन्सुरंस कंपनी ली., लातूर यांच्याशी करण्यात येणाऱ्या सामजस्य कराराबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.९ **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.Ed. या पदव्युत्तर अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२१-२२ पासून "प्राचार्य कै. श्री. राजशेखर कळसे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,१५,०००/- (तीन लाख पंधरा हजार रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: मा. श्री. संजय कळसे, श्री. चन्नवीर सड्डू, कळसे कुटूंबीय व मित्र परिवार यांच्या वतीने प्राचार्य कै. श्री. राजशेखर कळसे यांचे उचित स्मरण शिक्षण क्षेत्राच्या पटलावर व्हावे या उद्देशाने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.Ed. या पदव्युत्तर अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२१-२२ पासून प्रत्येक वर्षी "प्राचार्य कै. श्री. राजशेखर कळसे सुवर्णपदक" देण्यासाठी दि.३०/०५/२०२२ रोजीच्या पत्रासोबत धनादेश क्र.३०७७०७ नुसार रु.३,१५,०००/- इतकी देणगी विद्यापीठास दिली आहे. रु.३,००,०००/- रकमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यात यावे व रू.१५,०००/-सुवर्णपदकाच्या डायसाठी व यावर्षी सुवर्णपदक तयार करण्यासाठी वापरण्यात यावे, असा मानस विद्यापीठास कळविला होता.

दरम्यान नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने मा. श्री. संजय कळसे व श्री. चन्नवीर सड्डू, सोलापूर यांच्या कडून सुवर्णपदकासाठी रु.३,१५,०००/- (तीन लाख पंधरा हजार) इतकी रक्कम देणगी म्हणून धनादेशाव्दारे स्किारण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०९/०६/२०२२ रोजीच्या टिपणीवर मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला असून रु. ३,१५,०००/- इतक्या रकमेची पावती क्र.४०८३ दि.२४/०६/२०२२ अन्वये वित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.Ed. या पदव्युत्तर अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२१-२२ पासून सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक "प्राचार्य कै. श्री. राजशेखर कळसे सुवर्णपदक" या नावाने देण्याकरिता रु.३,१५,०००/- (तीन लाख पंधरा हजार रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव : **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.Ed. या पदव्युत्तर अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२१-२२ पासून "प्राचार्य कै. श्री. राजशेखर कळसे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु. ३,१५,०००/- (तीन लाख पंधरा हजार रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, पुण्यश्लोक

विषय क्र.१० पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून **M.A. Music (Master of Arts-Music)** या विषयातून प्रथम **येणाऱ्या** विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून "श्री.चिंतामण भास्कर फडणीस व कै. लता चिंतामण फडणीस स्मृती सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: मा. डॉ. अश्विनी वळसंगकर, सोलापूर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.A. Music (Master of Arts-Music) या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून प्रत्येक वर्षी "श्री. चिंतामण भास्कर फडणीस व कै. लता चिंतामण फडणीस स्मृती सुवर्णपदक" देण्यासाठी दि.०५/०४/२०२२ रोजीच्या पत्रासोबत धनादेश क्र.१३५८३१ नुसार रु.३,००,०००/- इतकी देणगी विद्यापीठास दिली आहे. रु.३,००,०००/- रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यात यावे असा मानस विद्यापीठास कळविला होता.

दरम्यान नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने मा. डॉ. अश्विनी वळसंगकर, सोलापूर यांच्या कडून सुवर्णपदकासाठी रु. ३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) इतकी रक्कम देणगी म्हणून धनादेशाव्दारे स्किारण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०५/०५/२०२२ रोजीच्या टिपणीवर मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला असून रु. ३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) इतक्या रक्कमेची पावती क्र. ७२५ दि.१०/०५/२०२२ अन्वयेवित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून M.A. Music (Master of Arts-Music) या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून "श्री.चिंतामण भास्कर फडणीस व कै. लता चिंतामण फडणीस स्मृती सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु. ३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| ठराव : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून **M.A. Music (Master of Arts-Music)** या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून **"श्री.चिंतामण भास्कर फडणीस व कै. लता चिंतामण फडणीस स्मृती सुवर्णपदक"** या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

विषय क्र.११ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून **LL.M. (Master of Law)** या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून "कै. गुंडोपंत सखाराम वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ व कै. विष्णुपंत गुंडोपंत वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ स्मृती सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: मा. ॲड. श्री. अशोक वळसंगकर, सोलापूर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून LL.M. (Master of Law) या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून प्रत्येक वर्षी "कै. गुंडोपंत सखाराम वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ व कै. विष्णुपंत गुंडोपंत वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ स्मृती सुवर्णपदक" देण्यासाठी दि.०५/०४/२०२२ रोजीच्या पत्रासोबत धनादेश क्र.१९६५८६ नुसार रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) इतकी देणगी विद्यापीठास दिली आहे. रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यात यावे असा मानस विद्यापीठास कळविला होता.

दरम्यान नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने मा. ॲड. श्री. अशोक वळसंगकर, सोलापूर यांच्या कडून सुवर्णपदकासाठी रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) इतकी रक्कम देणगी म्हणून धनादेशाव्दारे स्किारण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०५/०५/२०२२ रोजीच्या टिपणीवर मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला असून रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) इतक्या रकमेची पावती क्र. ७२७ दि.१०/०५/२०२२ अन्वये वित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून LL.M. (Master of Law) या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून "कै. गुंडोपंत सखाराम वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ व कै. विष्णुपंत गुंडोपंत वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ स्मृती सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| ठराव : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातून व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून **LL.M. (Master of Law)** या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२२-२३ पासून "कै. गुंडोपंत सखाराम वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ व कै. विष्णुपंत गुंडोपंत वळसंगकर जेष्ठ विधिज्ञ स्मृती सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता रु.३,००,०००/- (तीन लाख रुपये फक्त) प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

**विषय क्र.१२ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयासाठी द्वितीय सत्र आरंभ व समाप्तीच्या सुधारीत केलेल्या तारखांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदी अन्वये तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिपत्रक क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१/८७६० दि.३०/११/२०२१ अन्वये पारंपारिक विद्याशाखांचे व्दितीय सत्र आरंभ व समाप्तीचा कालावधी दि.०१/१२/२०२१ ते दि. ३०/०४/२०२२ असा होता. परंतू द्वितीय सत्र आरंभ व समाप्तीच्या तारखांमध्ये अशंतः बदल करणे आवश्यक होते. यास मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु नजीकच्या काळात उक्त प्राधिकरणाची बैठक आयोजित नसल्याने द्वितीय सत्र आरंभ व समाप्ती तारखेत बदल करणे तातडीचे असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदी अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांची व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घेऊन सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील संकुलांना द्वितीय सत्र आरंभ व समाप्ती चा कालावधी दि.२१/०४/२०२२ रोजीच्या सुधारित परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयासाठी द्वितीय सत्र आरंभ व समाप्तीच्या सुधारीत केलेल्या तारखांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदी अन्वये तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयासाठी द्वितीय सत्र आरंभ व समाप्तीच्या सुधारीत केलेल्या तारखांना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र.१३ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) (प) मधील तरतूदीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दरवर्षीप्रमाणे निश्चित करणे आवश्यक असल्याने सदरील बाब अधिष्ठाता मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता, त्यावर अधिष्ठाता मंडळाने दि.११/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

ठराव: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करुन विद्या परिषदेस शिफारस करण्यात आल्या.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा

| अ. क्र. | विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| १) | कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील व विद्यापीठातील शैक्षणिक संकुल), एम. एस. डब्ल्यू. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | १५ जुलै, २०२२ | १५ नोव्हेंबर, २०२२ | १० डिसेंबर, २०२२ | ३० एप्रिल, २०२३ |
| २) | विधी व शिक्षणशास्त्र (बी. एड., बी. पी. एड, एम. एड, एम. पी. एड, एम. ए. एज्युकेशन इ.) (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये) | १५ जुलै, २०२२ | १५ नोव्हेंबर, २०२२ | १० डिसेंबर, २०२२ | ३० एप्रिल, २०२३ |
| ३) | अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम. बी. ए. इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले) | ०१ ऑगस्ट, २०२२ | १५ डिसेंबर, २०२२ | १५ जानेवारी, २०२३ | ३१ मे, २०२३ |

दि. २१ ऑक्टोबर ते दि. २७ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत दिपावली निमित्त सुट्टी देय राहील.

सबब, उक्त ठरावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयाकरीता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन अधिष्ठाता मंडळाने विद्या परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ असा विषय विद्यापरिषदेस सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ठराव: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयातील सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा अधिष्ठाता मंडळाने विद्या परिषदेस केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.

१) अ.क्र.१ मध्ये प्रथम सत्राच्या प्रारंभ तारीख १५ जुलै, २०२२ ऐवजी १ ऑगस्ट, २०२२ व समाप्ती तारीख १५ नोव्हेंबर, २०२२ ऐवजी २५ नोव्हेंबर, २०२२.
२) अ.क्र. २ मध्ये समाप्ती तारीख १५ नोव्हेंबर, २०२२ ऐवजी २५ नोव्हेंबर, २०२२.
३) दि. २१ ऑक्टोबर, २०२२ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत दिपावली निमित्त सुट्टी देय राहील.

दरम्यानच्या कालावधीत तातडीने परिपत्रक निर्गमित करुन विद्यापीठ परिसरातील संकुलास व संलग्नित महाविद्यालयास कळविणे आवश्यक होते, त्यामुळे मा. कुलगुरु यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यतेस अनुसरुन प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे. सोबत दि.२८/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेची व परिपत्रकाची छायांकित प्रत जोडली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलास व संलग्नित सर्व महाविद्यालयास सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा दुरुस्तीसह निश्चित करुन विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.१४ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, अतिरिक्त तुकडी, विषय व विद्याशाखा सुरू करण्यासाठी विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांवर दि. १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास तातडीने सादर करणे बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ पोटकलम ४ (क) मधील तरतुदीनुसार नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी विद्यापीठास सादर करण्याची अंतिम मूदत ही दि. ३० सप्टेंबर अशी आहे.

तथापि, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, दि. ०६/१०/२०२१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.२१/१०/२०२१ परिपत्रकान्वये दि.३१ ऑक्टोंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि.३१/१०/२०२१ रोजी पर्यंत एकूण ४२ प्रस्ताव प्राप्त झाले होते.

त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या ४२ प्रस्तावावर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी नुसार विहित कार्यवाही करण्यात आली.

सदर प्राप्त प्रस्तावांवर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही पूर्ण करून सदरचे पात्र प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसह शासनास सादर करावयाचे असतात. तथापि, दरम्यानच्या कालावधीत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील संबंधित अधिकारी यांनी दि.३०/०३/२०२२ रोजी भ्रमणध्वनीव्दारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (ग) मधील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करण्याबाबत प्राप्त प्रस्ताव विहित कार्यवाही करून दि.३१/०३/२०२२ पर्यंत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचविले होते. त्यादरम्यान व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरू यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात सदरील ४२ प्राप्त प्रस्तावापैकी पात्र ३७ प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून दि.३१/०३/२०२२ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, अतिरिक्त तुकडी, विषय व विद्याशाखा सुरू करण्यासाठी विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांवर दि. १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास तातडीने सादर करणे बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यास पाठयक्रम, अतिरिक्त तुकडी, विषय व विद्याशाखा सुरू करण्यासाठी विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांवर दि. १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास तातडीने सादर करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.१५ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ अन्वये व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि.१५/०९/२०१७ च्या शासन निर्णयात नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी विविध संस्था कडून दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी प्रस्ताव मागविण्यात यावे अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (ग) अन्वये "विहित केलेल्या उपरोक्त कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील. विद्यापीठ अर्जासोबत व्यवस्थापन परिषदेला उचित वाटतील त्याप्रमाणे, संबंध्द कारणांनी यथोचितरित्या पुष्टी दिलेल्या आपल्या शिफारशी सादर करील" अशी तरतूद आहे.

तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ मध्ये दि.०६/१०/२०२१ च्या सुधारित अध्यादेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी अंतिम दि.३१/१०/२०२१ असा देण्यात आला असल्याने तसेच विद्यापीठाचा एक वर्षाचा बृहत आराखडा व नवीन महाविद्यालयांच्या स्थळबिंदूना शासनाकडून दि.०६/१०/२०२१ रोजी मंजूरी मिळालेली नसल्याने दि.१२/१०/२०२१ रोजीच्या मान्य टिपणीस अनुसरून व दि.०३/०८/२०२१ रोजी शासनास सादर केलेला एक वर्षाच्या बृहत आराखडयास शासन मान्यतेच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाकरिता नवीन महाविद्यालय व परिसंस्थासाठी विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील स्थळबिंदूनुसार नवीन महाविद्यालय सुरू करणेसाठी इच्छुक असणाऱ्या संस्थाकडून विहित नमुन्यात, विहित मुदतीत योग्य शुल्कासह प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करणेसाठी दि.१५/१०/२०२१ ते १७/१०/२०२१ या कालावधीत विविध वर्तमानपत्रात जाहिर निवेदन प्रसिध्द करून प्रस्ताव मागविण्यात आले होते, त्यानुसार दि. ३१/१०/२०२१ पर्यंत एकूण ०५ प्रस्ताव प्राप्त झाले होते.

दरम्यानच्या कालावधीत मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यापीठनिहाय नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी स्थळबिंदू निश्चित करून दिले. तर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या दि.१९/०४/२०२२ च्या सुधारित अध्यादेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी अंतिम दि.३०/०४/२०२२ असा देण्यात आला असल्याने शैक्षणिक

वर्ष २०२२-२३ या वर्षाकरिता स्थळबिंदूनुसार नवीन महाविद्यालय सुरू करणेसाठी इच्छुक असणाऱ्या संस्थाकडून विहित नमुन्यात, विहित मुदतीत योग्य शुल्कासह प्रस्ताव मागविणेबाबत विविध वर्तमानपत्रात (दै. लोकमत, दै. सकाळ, दै. संचार) जाहिर निवेदन प्रसिध्द केल्यानुसार दि.३०/०४/२०२२ पर्यंत एकूण ०५ प्रस्ताव प्राप्त झाले होते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत शासनमान्यतेच्या अधिन राहून रितसर प्राप्त झालेले ०५ प्रस्ताव व दि.२२/०४/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये स्थळबिंदू निश्चिती नुसार रितसर प्राप्त झालेले ०५ प्रस्ताव असे एकूण १० प्रस्ताव प्राप्त झाले होते सदर प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही पूर्ण करून सदरचे पात्र प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसह दि. ३१/०५/२०२२ पर्यंत शासनास सादर करावयाचे होते. त्यादरम्यान व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरू यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात उपरोक्त १० प्राप्त प्रस्तावापैकी ०९ पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत दि.२५/०५/२०२२ रोजीच्या टिपणी अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नवीन महाविद्यालय सुरु करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.१६ महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.०७ एप्रिल,२०२२ रोजीची अधिसूचना व उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१ दि.११ एप्रिल,२०२२ रोजीचे शासन निर्णयावर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणी करणेबाबत उक्त शासन निर्णय अन्वये कळविले आहे.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमधील संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आले आहेत.

१) शासन अधिसूचना दि.०७/०४/२०२२ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार प्रत्येक विद्यापीठातील तसेच एकाच व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखालील सर्व महाविद्यालयांतील अध्यापक संवर्गातील (समान वेतन श्रेणीतील) सर्व विषयांतील मंजुर पदे एकत्रित करण्यात यावीत.

२) संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांची संख्या विचारात घेऊन प्रचलित आरक्षण धोरणातील विहित टक्केवारीनुसार निश्चित करण्यात यावे. तसेच समांतर आरक्षणासंदर्भात शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) संवर्गातील एकुण मंजूर पदे व कार्यरत पदे विचारात घेऊन संवर्गाची बिंदूनामावली पदांच्या गोषवाऱ्यासह विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. तद्नंतर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांच्या संख्येस लागू होणार असल्याने त्याप्रमाणे बिंदूनामावलीची तपासणी करुन शासन निर्णय दि.१८/१०/१९९७ मधील तरतूदीनुसार रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात यावे व सदर बिंदूनामावलीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

४) संवर्गनिहाय आरक्षण धोरणानुसार भरतीप्रक्रिया राबविण्याविषयी कार्यपध्दती.

५) संवर्गनिहाय आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यपध्दती.

६) आरक्षण धोरणातील बदलामुळे काही प्रवर्गातील पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. अशा प्रवर्गामध्ये सद्य:स्थितीत पद भरती करताना कोणत्याही संवर्गात कोणत्याही परिस्थितीत अध्यापक अतिरिक्त ठरणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. अतिरिक्त ठरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यवस्थापनाची राहील. आरक्षण धोरणातील बदलामुळे एखाद्या प्रवर्गात अतिरिक्त ठरलेले अध्यापक त्या-त्या प्रवर्गातील पदे रिक्त झाल्यावर त्याच प्रवर्गातील बिंदूवर दर्शविण्यात यावे.

वरीलप्रमाणे पताका अ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/ संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणी करणेबाबत उक्त शासन निर्णय अन्वये कळविले आहे.

तसेच अधिसूचना अन्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये अध्यापकांच्या सरळसेवा भरतीसाठी विषयनिहाय आरक्षणाऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू केल्याचे उक्त शासन अधिसूचनाव्दारे कळविले आहे.

१) राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या तसेच अनुदान दिलेल्या शैक्षणिक संस्थामधील अध्यापक संवर्गातील (समान वेतनश्रेणीतील) सर्व विषयांतील मंजूर पदे एकत्रित करण्यात येथील व सोबतच्या नमुद I to XXI नुसार संवर्गनिहाय आरक्षण लागू राहील.

२) वरीलप्रमाणे संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांची संख्या विचारात घेऊन प्रचलित आरक्षण धोरणातील विहित टक्केवारीनुसार निश्चित करण्यात यावे.

३) संवर्गातील एकुण मंजूर पदे व कार्यरत पदे विचारात घेऊन अध्यापक संवर्गाची बिंदूनामावली पदांच्या गोषवाऱ्यासह विहित नमुन्यात ठेवण्यात यावी. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ (२०२२ चा १७) नुसार संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकुण मंजूर पदांच्या संख्येस लागू होणार आहे. त्याप्रमाणे बिंदूनामावली तपासणी करुन रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात यावे व सदर बिंदूनामावलीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी. असे उक्त उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील अधिसूचनेव्दारे कळविले आहे.

दि.१३/०४/२०२२ रोजीच्या मान्य टिपणीन्वये मा. कुलगुरु यांनी नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदचे बैठक नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठ पत्र क्र. जावक क्र. पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२२/२७४२ दि.२१/०४/२०२२ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व प्रस्तूत विद्यापीठ आस्थापना विभागास कळविण्यात आले आहे.

सबब, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.०७ एप्रिल,२०२२ रोजीची अधिसूचना व उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१ दि.११ एप्रिल,२०२२ रोजीचे शासन निर्णयावर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.०७ एप्रिल,२०२२ रोजीची अधिसूचना व उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१ दि.११ एप्रिल,२०२२ रोजीचे शासन निर्णयावर, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.१७ छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्या बाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) भरती करण्यासाठी बिंदूनामावली विहित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब दि.२५/०२/२०२२ रोजीचे शासन निर्णयावर कार्यवाही करणेबाबत, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये छोटया संवर्गातील मागासवर्गीय करिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती कशी असावी याबाबत दि.२९ मे, २०१७ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

दि. २१ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्युएस) आरक्षणासह छोटया संवर्गातील मागासवर्गीयकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

दि. २१ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या सामान्य प्रशासन निर्णयाच्या परिपत्रकान्वये छोटया संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबत देण्यात आलेल्या सूचना अधिक्रमित करुन सुधारित सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधित होती त्यास अनुसरुन छोटया संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

१) राज्यातील बिगर आदिवासी जिल्हामधील सरळसेवेतील छोटया संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यवाही सोबत जोडलेल्या अनुसूची अ मध्ये विहित करण्यात आली आहे.

२) राज्यातील बिगर आदिवासी जिल्हांमधील छोटया संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरताना सरळसेवेच्या बाबतीत दि.२९ मे, २०१७ च्या शासन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन सोबत जोडलेल्या अनुसूची अ प्रमाणे कार्यवाही करावी.

तरी वरीलप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब दि.२५ फेब्रुवारी, २०२२ नुसार कार्यवाही करण्याबाबत उक्त पत्रान्वये कळविले आहे.

दि. २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या मान्य टिपणीन्वये मा.कुलगुरु यांनी नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदचे बैठक नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांच्या अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठ पत्र क्र. जावक क्र.पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२२/१६२३ दि.०७ मार्च, २०२२ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व प्रस्तूत विद्यापीठ आस्थापना विभागास कळविण्यात आले आहे.

सबब, छोटया संवर्गातील मागासवर्गीयाकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) भरती करण्यासाठी बिंदूनामावली विहित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब दि.२५/०२/२०२२ रोजीचे शासन निर्णयावर कार्यवाही करणेबाबत, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) भरती करण्यासाठी बिंदूनामावली विहित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब दि.२५/०२/२०२२ रोजीचे शासन निर्णयावर कार्यवाही करणेबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.१८ प्रस्तुत विद्यापीठामध्ये मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने नोंदणीकृत पुरवठादार/ ठेकेदारांकडून ई-निविदाद्वारे घेण्यासाठी ई-निविदा नियमावली QCBS पध्दतीनुसार तयार करण्याकरिता गठित केलेल्या समितीचा कार्यवृत्तांत व नविन नियमावली नुसार कार्यवाही करण्याबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने नोंदणीकृत पुरवठादार/ ठेकेदारांकडून ई-निविदाद्वारे घेण्यासाठी ई-निविदा नियमावली QCBS पध्दतीनुसार तयार करण्याकरिता मा. कुलगुरु यांनी गठित केलेल्या समितीची द्वितीय व अंतिम बैठक गुरुवार, दि.०२/०६/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयातील बैठक कक्षात संपन्न झाली. त्यानुसार समितीचा अहवाल (कार्यवृत्तांत) सदर समितीने दि.०२/०६/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयास सादर केलेला आहे. तसेच मा. व्यस्थापन परिषदेच्या दि.२६/११/२०२१ रोजीच्या बैठकीमधील विषय क्र.०८ वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने, सदरची नियमावलीस मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतू, दरम्यानच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने व सदर नियमावलीनुसार ई-निविदाची प्रक्रिया तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी मान्यता दिलेली आहे. (सोबत समितीचा अहवाल (कार्यवृत्तांत) व नविन नियमावली जोडलेली आहे.)

सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने नोंदणीकृत पुरवठादार/ठेकेदारांकडून ई-निविदाद्वारे घेण्यासाठी ई-निविदा नियमावली QCBS पध्दतीनुसार तयार करण्याकरिता गठित केलेल्या समितीचा कार्यवृत्तांत व नविन नियमावली नुसार कार्यवाही करण्याबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने नोंदणीकृत पुरवठादार/ ठेकेदारांकडून ई-निविदाद्वारे घेण्यासाठी ई-निविदा नियमावली QCBS पध्दतीनुसार तयार करण्याकरिता गठित केलेल्या समितीचा कार्यवृत्तांत व नविन नियमावली नुसार कार्यवाही करण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ पुण्यश्लोक

विषय क्र.१९ प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: मा. व्यस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र.१३(१) वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने व मा. कुलगुरु यांनी दि.०२/०३/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये दिलेल्या मान्यतेनुसार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना दि.०६/०४/२०२२ ते दि.०५/०५/२०२२ पर्यंत अशा एक महिना अथवा ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवा शुल्कानुसार देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०५/२०२२ रोजी संपणार आहे. तसेच QCBS पध्दतीनुसार ई-निविदाची नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगुरु यांनी गठित केलेल्या समितीची प्रथम बैठक दि.०६/०४/२०२२ रोजी पार पडली असून सदर समितीचा कार्यवृत्तांत मा. कुलगुरु यांच्यासमोर दि.२१/०४/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये सादर करण्यात आलेला आहे. तसेच सद्यस्थितीत सदर समितीचे कामकाज चालू आहे. परंतू संबंधित कंत्राटदारास देण्यात आलेली मूदत ही दि.०५/०५/२०२२ रोजी संपणार असल्याने संबंधित कंत्राटदारास मूदतवाढ देणे आवश्यक होते.

तसेच, सद्यस्थितीत मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०५/२०२२ रोजी संपणार असल्याने व मा. कुलगुरु यांनी गठित केलेल्या उपरोक्त नमूद केलेल्या समितीचे कामकाज सद्यस्थितीत चालू असल्याने व सदर समितीकडून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व सदर अहवालानुसार ई-निविदाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी कमीत कमी दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा तीन महिने यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्तीवर मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना मूदतवाढ मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन देणे आवश्यक होते. तथापि, दरम्यानच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारास दि.०६/०५/२०२२ पासून तीन महिने अथवा ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे असे दि.०५/०५/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना दि.०६/०५/२०२२ पासून तीन महिने अथवा ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरिता खाजगी मनुष्यबळ पुरवठादार मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ पुण्यश्लोक

विषय क्र.२० प्रस्तुत विद्यापीठातील गट ड मधील हवालदार या पदांच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील गट ड मधील हवालदार या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त असलेल्या पदावर पात्र कर्मचाऱ्याला पदोन्नती देणे आवश्यक होते.

उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार हवालदार या रिक्त पदांवर पदोन्नती देण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.१६/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक कक्षामध्ये संपन्न झाली.

विभागीय पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पात्र खालील उमेदवाराची शिफारस केलेली असून त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र. पुअहोसोविसो/आस्था/पदोन्नती/२०२२/४५४१, दि.१७/०६/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पदोन्नती देण्यात आली आहे (सोबत समितीचा अहवाल व कार्यालयीन आदेशाची प्रत जोडलेली आहे].

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम | पदोन्नतीचा पदनाम | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | श्री. मजगे आत्मलिंग प्रभू<br>शिपाई | हवालदार | अराखीव (खुला) |

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील गट ड मधील हवालदार या पदाच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदावर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव).

| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठातील गट ड मधील हवालदार या पदांच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिलेल्या बाबीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

विषय क्र.२१ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण ९६ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणेसंदर्भात, तसेच स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत, मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: विद्यापीठात दरवर्षी नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित शिल्लक कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार माहे एकत्रित वेतनावर तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरली जातात. त्यानुषंगाने विद्यापीठ परिसर सर्व संकुलांचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीचा विषयनिहाय कार्यभार या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/Walk-in-Interview/ २०२२/३०७१, दि. ०५ मे, २०२२ अन्वये मागविण्यात आला होता.

त्यानुसार संबंधित संकुलाच्या संचालकांनी अनुदानित ०५ संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार व उर्वरित कार्यभार सादर केला आहे. तर विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत असलेल्या ०६ संकुलाच्या प्र. संचालकांनी लागणारी कंत्राटी शिक्षकीय पदे व त्याचा कार्यभार सादर केला आहे.

मा. कुलगुरु यांनी अनुदानित, विनाअनुदानित तसेच विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत असलेल्या संकुलातील कार्यभाराचा आढावा घेऊन दि. ०३/०६/२०२२ रोजीच्या मान्यता टिपणी अन्वये खालीलप्रमाणे एकूण ९६ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक पदे भरण्यास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदरची ९६ पदे भरणे संदर्भात विषय तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशनाची बाब दि. १०/०६/२०२२ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवले असता, मा. कुलगुरु यांनी तातडीची बाब म्हणून सदर विषयास व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये, डॉ. एस. के. पाटील यांचे व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून नामनिर्देशन केले आहे.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

| अ.क्र. | संकुलाचे नाव | संकुलाकडील एकूण कार्यभार | मागणी केलेली शिक्षकांची संख्या | आढाव्याअंती मंजूर करण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|---|
| १) | पदार्थविज्ञान संकुल | ४६४ | ०९ | ०८ |
| २) | रसायनशास्त्र संकुल | ५६० | १३ | १० |
| ३) | भूशास्त्र संकुल | ३८४ | ०९ | ०६ |
| ४) | सामाजिकशास्त्रे संकुल | २५२ | ११ | १० |
| ५) | संगणकशास्त्र संकुल | ७३६ | १६ | १२ |
| ६) | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | ६१६ | १० | १० |
| ७) | भाषा व वाङ्मय संकुल | ६४० | १६ | १६ |
| ८) | तंत्रज्ञान संकुल | ५१४ | १६ | १० |
| ९) | आरोग्य विज्ञान संकुल | ११६ | ०३ | ०३ |
| १०) | ललित कला व कला संकुल | १०२ | ०८ | ०७ |
| ११) | जैवशास्त्र संकुल | ४६४ | ०४ | ०४ |
| | एकूण | ४८४८ | ११५ | ९६ |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण ९६ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणे संदर्भात, तसेच स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा. कुलगुरु यांनी १२ (७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण ९६ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणेसंदर्भात, तसेच स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील यांचे नामनिर्देशनाबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र.२२ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हातात शिवपिंड असलेले पुतळा तयार करणे या कामासाठी श्री. राम सुतार, शिल्पकार तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रकीय रक्कम रू. ७९,५२,०००/-( एकोणऐंशी लाख बावन हजार रुपये फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हातात शिवपिंड असलेले पुतळा तयार करणे या कामासाठी श्री. राम सुतार, शिल्पकार तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रक विचारार्थ दिनांक ३१ मार्च २०२२ रोजीच्या मा. इमारत व बांधकाम समितीच्या विषय क्र. ०६ (०२) अन्वये सादर केले असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हातात शिवपिंड असलेले पुतळा तयार करणे या कामासाठी श्री. राम सुतार, शिल्पकार तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रकीय रक्कम रू.७९,५२,०००/- (रू. एकोणऐंशी लाख बावन हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यास व मे. राम सुतार आर्ट क्रिएशन्स प्रायव्हेट लिमिटेड, नोयडा (उत्तर प्रदेश) यांना रूपये रू.७९,५२,०००/-(रू एकोणऐंशी लाख बावन हजार फक्त) इतक्या रक्कमेची कार्यारंभ आदेश देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०० (५) (ग) नुसार नमुद केलेली तरतुदी विचारात घेता, सर्व लहान व आणि मोठया बांधकामाच्या संदर्भात, व्यवस्थापन परिषदेस शिफारस करील आणि प्रशासकीय मान्यता आणि खर्चास मंजुरी देण्याची बाब इमारत व बांधकाम समितीची असल्याने नमुद केले आहे.

उक्त बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नसल्याने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देणे व प्रशासकीय कार्यवाहीसाठी अंदाजे ०२ ते ०३ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी चबुतरा बांधकाम, लॅन्डस्केप, सुशोभिकरण व टॉवर बांधणे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर या कार्यालयाकडून ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणी करीता राज्य शासनाने गठित केलेल्या स्मारक समिती सदस्यांकडून पुतळा शिल्पाबाबत वेळोवळी विचारणा होत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★

पुतळा शिल्पासाठी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम करुन घेण्यासाठी बराचसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मे. राम सुतार, नोयडा यांना विहित मुदतीत कार्यारंभ आदेश दिल्यास त्यांच्याकडून स्मारकाचे काम पूर्ण होईपर्यत पुतळा शिल्पाचे काम करून घेणे आवश्यक आहे. कार्यारंभ आदेश देण्यासाठी विलंब

झाल्यास भविष्यात पुतळा शिल्पासाठी येणा-या खर्चामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विविध कार्यालयाकडून पुतळाकरीता परवानग्या घेणे आवश्यक असून सदरचे काम हे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर करणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे.

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हातात शिवपिंड असलेले पुतळा तयार करणे या कामासाठी श्री. राम सुतार, शिल्पकार तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रकीय रक्कम रू.७९,५२,०००/-(अक्षरी एकोणऐंशी लाख बावन हजार रुपये फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देण्यासाठी सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हातात शिवपिंड असलेले पुतळा तयार करणे या कामासाठी श्री. राम सुतार, शिल्पकार तथा पद्मश्री पुरस्कार प्राप्त यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रकीय रक्कम रू. ७९,५२,०००/-( एकोणऐंशी लाख बावन हजार रुपये फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश देण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.२३ दि.३१/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: दि.३१/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

परंतु दरम्यानच्या कालावधीत व्यवस्थापन परिषदेची सभा आयोजित झालेली नाही. तसेच बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नाही. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर त्यापुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी अंदाजे ०२ ते ०३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. सदर इतिवृत्तांतानुसार विविध कामासाठीचे मक्तेदारांचे देयक अदा करणे गरजेचे होते. विद्यापीठ परिसरातील विविध बांधकामाच्या कामासाठीचे मक्तेदारांकडून प्रत्यक्षात अथवा दूरध्वनीद्वारे देयकाबाबत वेळोवळी विचारणा होत होती. मक्तेदारांचे देयक वेळेत देणे आवश्यक होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०० (५) (ग) नुसार नमुद केलेली तरतुदी विचारात घेता, सर्व लहान व आणि मोठया बांधकामाच्या संदर्भात, व्यवस्थापन परिषदेस शिफारस करील आणि प्रशासकीय मान्यता आणि खर्चास मंजुरी देण्याची बाब इमारत व बांधकाम समितीची असल्याचे नमुद केले आहे.

मा. व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने मक्तेदारांचे देयक अदा करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, दि.३१/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| ठराव : | दि.३१/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मान्यता देणेबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय क्र.२४ विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. शिवशक्ती भोजनालय ॲन्ड हॉटेल, सोलापूर यांनी अ. क्र. १ ते ३० वस्तूकरिता न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराचे दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाचे दरपत्रक मागविण्याची वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडुन विहीत प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांनी दि.१७/०५/२०२२ रोजी दरपत्रके मागविण्याची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.१८/०५/२०२२ पासून दि.२६/०५/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीपर्यंत एकुण ०७ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. सदर कामासाठी प्राप्त ०७ ही दरपत्रकधारकाची तांत्रिक लिफाफे खरेदी समिती सदस्यांसमोर उघडण्यात आली. त्यानंतर ०७ ही दरपत्रकधारकांच्या कागदपत्राची तपासणी तांत्रिक समिती सदस्यांकडुन करण्यात आली. त्यामध्ये ०५ दरपत्रकधारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरले व ०२ दरपत्रकधारक हे अपात्र ठरले.

सदर कामासाठी प्राप्त झालेले सर्व दरपत्रके हे खरेदी समिती समोर उघडण्यात आले आहेत. त्यानंतर सदर कामाचे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणेकरिता एकूण ३० वस्तूपैकी १९ वस्तूंचे दर न्युनतम दिलेले असून इतर ११ वस्तूंचे दर ही बाजारभावाप्रमाणे वाजवी दिलेले आहेत. इतर दरपत्रकधारक यांनी ११ वस्तूंचे दर हे बाजारभावापेक्षा कमी दिल्याचे दिसून येते. विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणेच्या अ. क्र. १ ते ३० वस्तूकरिता न्युनतम दर मे. शिवशक्ती भोजनालय ॲन्ड हॉटेल, सोलापूर हे असल्याने त्यांचे दरपत्रक शिफारस करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसरात विद्यापीठाच्या विविध कामासाठी येणारे महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांना चहा व अल्पोपहार करण्यासाठी विद्यापीठाबाहेर जावे लागत असल्याने व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नाही. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देणे व कार्यवाहीसाठी अंदाजे ०१ ते ०२ महिन्याचा कालावधी लागणार आहे. विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालू करण्याबाबत सर्वांकडून वेळोवेळी / वारंवार विचारणा होत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने उपाहारगृह लवकरात लवकर चालू

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांची व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. शिवशक्ती भोजनालय ॲन्ड हॉटेल, सोलापूर यांनी अ. क्र. १ ते ३० वस्तूकरिता न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराचे दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांची व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. शिवशक्ती भोजनालय ॲन्ड हॉटेल, सोलापूर यांनी अ. क्र. १ ते ३० वस्तूकरिता न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराचे दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.२५ विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. औसा उद्योग समुह, औसा यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु. २,३९०/- इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाचे दरपत्रक मागविण्याची वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडुन विहीत प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांनी दि.१८/०५/२०२२ रोजी दरपत्रके मागविण्याची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.२६/०५/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीमध्ये एकुण ०१ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. सदरचे काम करण्याकरिता किमान ०३ दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे. परंतु सदर सदर कामाचे दरपत्रके ०३ पेक्षा कमी प्राप्त झाले असल्याने पहिली मुदतवाढ घेण्याकरिता दि. २७/०५/२०२२ रोजी वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाने मा. कुलगुरु महोदया यांची मान्यता घेण्यात आलेला होती. त्यानुसार वित्त व लेखा विभाग (खरेदी व भांडार) विभागाकडुन सदर कामाची दि.३०/०५/२०२२ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.०३/०६/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीत ०२ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले आहे. त्याप्रमाणे सदर कामाच्या दरपत्रके दोन्ही मुदतीत एकुण ०३ दरपत्रके प्राप्त झाले आहेत. सदर कामासाठी प्राप्त ०३ ही दरपत्रकधारकाची तांत्रिक लिफाफा खरेदी समिती सदस्यांसमोर उघडण्यात आली. त्यानंतर ०३ ही दरपत्रकधारकांच्या कागदपत्राची तपासणी तांत्रिक समिती सदस्यांकडुन करण्यात आली. त्यामध्ये ०२ दरपत्रकधारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरले व ०१ दरपत्रकधारक हे अपात्र ठरले.

सदर कामासाठी प्राप्त झालेले सर्व दरपत्रके हे खरेदी समिती समोर उघडण्यात आले आहेत. त्यानंतर सदर कामाचे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणेकरिता प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु. २,३९०/- इतके न्युनतम दर मे. औसा उद्योग समुह, औसा हे असल्याने त्यांचे दरपत्रक शिफारस करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृह पुर्ण क्षमतेने चालू झाले असल्यामुळे विद्यार्थ्यांना जेवण व अल्पोपहार करण्यासाठी विद्यापीठाबाहेर जावे लागत असल्याने मा. व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नाही.

मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देणे व कार्यवाहीसाठी अंदाजे ०१ ते ०२ महिन्याचा कालावधी लागणार आहे. विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालू करण्याबाबत विद्यार्थ्यांकडून वेळोवेळी / वारंवार विचारणा होत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मा. व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने मुलांचे वसतिगृह लवकरात लवकर चालू करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु महोदया यांची मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. औसा उद्योग समुह, औसा यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु. २,३९०/- इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. औसा उद्योग समुह, औसा यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु. २,३९०/- (दोन हजार तीनशे नव्वद फक्त) इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.२६ विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. राजराजेश्वरी महिला बचत गट, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु. १,८००/- (एक हजार आठशे फक्त) इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांचे न्युनतम दराचे दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास, त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालविणे या कामाचे दरपत्रक मागविण्याची वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडुन विहीत प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांनी दि.१७/०५/२०२२ रोजी दरपत्रके मागविण्याची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.१८/०५/२०२२ पासून दि.२६/०५/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीपर्यंत एकुण ०३ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. सदर कामासाठी प्राप्त ०३ ही दरपत्रकधारकाची तांत्रिक लिफाफा खरेदी समिती सदस्यांसमोर उघडण्यात आली. त्यानंतर ०३ ही दरपत्रकधारकांच्या कागदपत्राची तपासणी तांत्रिक समिती सदस्यांकडुन करण्यात आली. त्यामध्ये ०२ दरपत्रकधारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरले व ०१ दरपत्रकधारक हे अपात्र ठरले.

सदर कामासाठी प्राप्त झालेले सर्व दरपत्रके हे खरेदी समिती समोर उघडण्यात आले आहेत. त्यानंतर सदर कामाचे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालविणेकरिता प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रुपये १,८००/- इतके न्युनतम दर मे. राज राजेश्वरी महिला बचत गट, सोलापूर हे असल्याने त्यांचे दरपत्रक शिफारस करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह पुर्ण क्षमतेने चालू झाले असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जेवण व अल्पोपहार करण्यासाठी विद्यापीठाबाहेर जावे लागत असल्याने मा. व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नाही. मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देणे व कार्यवाहीसाठी अंदाजे ०१ ते ०२ महिन्याचा कालावधी लागणार आहे. विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालू करण्याबाबत विद्यार्थ्यांनीकडून वेळोवेळी / वारंवार विचारणा होत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मा. व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ लवकरात लवकर चालू करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांची मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. राज राजेश्वरी महिला बचत गट, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रुपये १,८००/- इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांची मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०१ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. राजराजेश्वरी महिला बचत गट, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रु.१,८००/- (एक हजार आठशे फक्त) इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांचे न्युनतम दराचे दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.२७ विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. सुवर्णराज महिला मंडळ शाखा मार्डी, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रुपये १,८००/- (एक हजार आठशे फक्त) इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास, त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ चालविणे या कामाचे दरपत्रक मागविण्याची वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडुन विहीत प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांनी दि.१७/०५/२०२२ रोजी दरपत्रके मागविण्याची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.२६/०५/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीपर्यंत एकुण ०१ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले होते. सदरचे काम करण्याकरिता किमान ०३ दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे दरपत्रके ०३ पेक्षा कमी प्राप्त झाले असल्याने पहिली मुदतवाढ घेण्याकरिता दि. २७/०५/२०२२ रोजी वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाने मा. कुलगुरु यांची मान्यता घेण्यात आलेला होती. त्यानुसार वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडून सदर कामाची दि.२७/०५/२०२२ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.०६/०६/२०२२ रोजीपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीपर्यंत एकुण ०१ दरपत्रके विद्यापीठास प्राप्त झाले आहे. सदर कामाकरिता पुन्हा दुसरी मुदतवाढ घेण्याकरिता दि.०६/०६/२०२२ रोजी वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाने मा. कुलगुरु यांची मान्यता घेऊन अंतिम मुदतवाढ दि.१०/०६/२०२२ रोजीपर्यंत देण्यात आलेली होती. सदर दिलेल्या मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झाले नाही. त्याप्रमाणे सदर कामाच्या दरपत्रके मागविण्याच्या दिलेल्या मुदतीत ०१ दरपत्रके व दुसऱ्या दरपत्रके मागविण्याच्या दिलेल्या मुदतीत ०१ दरपत्रक असे दोन्ही मुदतीत एकुण ०२ दरपत्रके प्राप्त झाले आहेत. सदर कामासाठी प्राप्त ०२ ही दरपत्रकधारकाची तांत्रिक लिफाफा खरेदी समिती सदस्यांसमोर उघडण्यात आली. त्यानंतर ०२ ही दरपत्रकधारकांच्या कागदपत्राची तपासणी तांत्रिक समिती सदस्यांकडुन करण्यात आली. त्यामध्ये ०२ ही दरपत्रकधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले.

सदर कामासाठी प्राप्त झालेले सर्व दरपत्रके हे खरेदी समिती समोर उघडण्यात आले आहेत. त्यानंतर सदर कामाचे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र.०२ चालविणेकरिता प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम

रु. १,८००/- इतके न्युनतम दर मे. सुवर्णराज महिला मंडळ शाखा मार्डी, सोलापूर हे असल्याने त्यांचे दरपत्रक शिफारस करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह पुर्ण क्षमतेने चालू झाले असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जेवण व अल्पोपहार करण्यासाठी विद्यापीठाबाहेर जावे लागत असल्याने मा. व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नाही. मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीची इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देणे व कार्यवाहीसाठी अंदाजे ०१ ते ०२ महिन्याचा कालावधी लागणार आहे. विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ चालू करण्याबाबत विद्यार्थ्यांनीकडून वेळोवेळी / वारंवार विचारणा होत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मा. व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ लवकरात लवकर चालू करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु यांची मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. सुवर्णराज महिला मंडळ शाखा मार्डी, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रुपये १,८००/- इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु यांची व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस क्र. ०२ चालविणे या कामाचे तुलनात्मक तक्त्याप्रमाणे न्युनतम दर असणारे मे. सुवर्णराज महिला मंडळ शाखा मार्डी, सोलापूर यांनी प्रती विद्यार्थी प्रती महिना रक्कम रुपये १,८००/- (एक हजार आठशे फक्त) इतके न्युनतम दर दिलेले असल्यामूळे त्यांची न्युनतम दराची दरपत्रक स्विकारणे, त्यांच्याकडून सुरक्षा ठेव भरणा करुन घेण्यास, त्यांच्याकडून १००/- रुपयाच्या बॉन्डवर करार करण्यास, त्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.२८ साई समर्थ एज्युकेशनल मेडीकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्या सोबत केलेल्या शैक्षणिक सहचर्य करारामधील अटीशर्ती मध्ये सुधारणा करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: आरोग्य विज्ञान संकुलामार्फत कौशल्य विकास केंद्राअंतर्गत चालणारा एक्युप्रेशर प्रमाणापत्र अभ्यासक्रम चालविण्यासाठी नागपूर येथील साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्यासोबत जागेवारी २०२१ पासून तीन वर्ष कालावधीसाठी शैक्षणिक सहचर्य करार करण्यासत आलेला आहे. सदर करारामधील अट क्र. ४.२ नुसार सदर अभ्यासक्रमापोटी विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या शैक्षणिक शुल्काच्या एकूण रक्कमेपैकी ६०% रक्कम श्रीसाई समर्थ एज्युकेशनल मेडिकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांना देय असेल असे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अट क्र. ३.१० नुसार सदर अभ्यासक्रम चालविताना विद्यापीठ अतिथीगृहात होणाऱ्या वास्तव्यापोटी होणाऱ्या निवासखर्चाची सोय सदर संस्थेने करावी असे ठरलेले आहे. संदर्भ क्र. २ नुसार साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांनी खालीलप्रमाणे विनंती मागण्या केलेल्या आहेत.

१. विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या शुल्काच्या रक्कमेपैकी ८०% रक्कम टीडीएस कपात न करता संस्थेस देण्यात यावी.

२. सदर प्रशिक्षण देण्यासाठी येणाऱ्या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठ अतिथीगृहात निशुल्क करण्यात यावी.

सबब, समर्थ एज्युकेशन मेडीकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांनी केलेल्या मागण्यावर निर्णय घेण्याची बाब विचारार्थ).

| ठराव : | साई समर्थ एज्युकेशनल मेडीकल एंड रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्या सोबत केलेल्या शैक्षणिक सहचर्य करारामधील अटीशर्ती मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१) विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या शुल्काच्या रक्कमेपैकी ७०% रक्कम टीडीएस कपात करुन संस्थेस देण्यात यावी.<br>२) सदर प्रशिक्षण देण्यासाठी येणाऱ्या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठाच्या अतिथीगृहात रुम उपलब्धतेनुसार शुल्क आकारुन देण्यात यावे. |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

**विषय क्र.२९ दि. १५/०५/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी: दि. १२/०५/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. यास General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार दि. १२/०५/२०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, दि. १५/०५/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **दि. १५/०५/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.३० महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन केलेले विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठ परिसंस्थेचे एका विभागप्रमुखांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) नुसार विद्यापीठ विभागांचे किंवा विद्यापीठ परिसंस्थेचे दोन प्रमुखांची खरेदी समितीवर दि.११/०२/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत ठराव क्र. ११ अन्वये खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले होते.

१. प्रा. डॉ. आर. बी. भोसले

२. प्रा. डॉ. जी. एस. कांबळे

वरीलपैकी प्रा. डॉ. आर. बी. भोसले हे दिनांक ३० एप्रिल, २०२२ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असून, त्यांच्या जागी खरेदी समितीवर नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) नुसार खरेदी समितीवर विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठ परिसंस्थेचे एका विभागाप्रमुखांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन केलेले विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठ परिसंस्थेचे एका विभागप्रमुखांमधून सर्वानुमते श्रीतमी डॉ. ज्यो. ध. माशाळे यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |

**विषय क्र.३१ विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्जाचे शुल्क निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळाच्या निवडणूका सन २०२२ मध्ये होणार असल्याने या निवडणूकीकरिता उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी उमेदवारी अर्जाचे शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्जाचे शुल्क रु. ५०/- ठरविण्यात आले होते.

सबब, सन २०२२ मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या विविध प्राधिकारणांच्या व मंडळांच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्जाचे शुल्क निश्चित करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्जाचे शुल्क सर्वानुमते रु. ५०/- (पन्नास रुपये फक्त) निश्चित करण्यात आले.** |

विषय क्र.३२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी सोबत झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत Uddyam-PAHSUI-Foundation Solapur Centre ला जागा (१०,००० Sq.ft. & ७,२८० Sq.ft.) (१० वर्षे) भाडेकरारावर देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र MSINS इनोव्हेशन मिशन या उपक्रमांतर्गत इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्यात आले असून, सदर इन्क्युबेशन सेंटर चालविण्याकरिता कंपनी कायदा Pursuant to Sub-section (२) of Section ७ and Sub-section (१) of Section ८ of the Companies Act, २०१३ (१८ of २०१३) Rule १८ of the Companies (Incorporation) Rules) २०१४ ची नोंदणी Corporate Identity No. U८०३००PN२०१९NPL१८७१९६ अन्वये करण्यात आलेला आहे. सदरची बाब विद्यापीठासाठी भुषणावह आहे.

सदर इन्क्युबेशन सेंटर हे महाराष्ट्र शासनाद्वारे अनुदानीत आहे. आपल्या विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी सोबत MoU केले आहेत. त्या सामंजस्य करारा अंतर्गत इन्कयुबेशन सेंटर ला इमारत भाडेतत्वावर (Lease) देणे बंधनकरार आहे. शासनाच्या इन्क्युबेशन सेंटर च्या विविध योजनासाठी अर्ज करण्याकरिता वरील भाडेतत्व करार करणे बंधन कारक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी सोबत झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत Uddyam-PAHSUI-Foundation Solapur Centre ला जागा (१०,००० Sq.ft. & ७,२८० Sq.ft.) (१० वर्षे) भाडेकरारावर देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी सोबत झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत Uddyam-PAHSUI-Foundation Solapur Centre ला जागा (१०,००० Sq.ft. & ७,२८० Sq.ft.) (१० वर्षे) भाडेकरारावर देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.३३ **प्रस्तुत विद्यापीठामध्ये VJNT समुदायावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींचे संशोधन करणेसाठी गठित समिती अध्यक्ष यांनी समितीवर कार्य करण्यास असमर्थतता दर्शविल्या बाबतचा अर्ज विचारार्थ.**

(टिपणी: उपरोक्त विषयी प्रस्तुत विद्यापीठामध्ये VJNT समुदायावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींचे संशोधन करणेसाठी जी समिती स्थापन करावयाची आहे. त्याबाबत व्यवस्थापन परिषदेकडून सदर समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे नामनिर्देशन झालेले आहे. त्याअनुषंगाने गठित समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना नामनिर्देशनाची पत्रे पाठविण्यात आली होती. त्यानुसार सदर समितीच्या प्रथम बैठकीचे आयोजन करावयाचे होते. परंतू, गठित समितीचे अध्यक्ष, डॉ. शिंगाडे अनंत बाळू-भारत महाविद्यालय जेऊर यांनी दि.०१/०२/२०२२ रोजी ईमेलव्दारे या विभागाकडे अर्ज सादर करुन ते कंबरदुखीच्या त्रासामुळे त्रस्त असल्याने व डॉक्टरांनी दूरच्या प्रवासास काही कालावधीसाठी मनाई केली असल्याने, सदर समितीवर कार्य करण्यास असमर्थ असल्याचे कळविलेले आहे. सदर जागेवर अन्य व्यक्तीची निवड करावी याबाबत विनंती केलेली आहे.

सबब, VJNT समुदायावर संशोधन करण्यासाठी डॉ. शिंगाडे अनंत बाळू-अध्यक्ष यांच्या जागी नवीन व्यक्तीचे फेरनामनिर्देशन होणेची बाब विचारार्थ).

| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये VJNT समुदायावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींचे संशोधन करण्यासाठी गठित समितीवर सर्वानुमते अध्यक्ष म्हणून डॉ. प्र. ना. कोळेकर यांचे नामनिर्देशन करण्यात आले. तसेच डॉ. सुहास दहिटणेकर, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात आले.** |
| --- | --- |

विषय क्र.३४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. विकास कदम यांनी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाचा राजीनामा सादर केल्याने त्यांना दि. १४/०९/२०२१ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदावरुन कार्यमुक्त करण्यात आल्याने अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा हे पद दि. १४/०९/२०२१ पासून रिक्त आहे. डॉ. विकास कदम यांनी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत व दैनिक संचार या वर्तमानपत्राच्या दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि. ०८/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.०६/०७/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ).

| ठराव : | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर सर्वानुमते प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे यांचे नामनिर्देशन करण्यात आले. |
|---|---|

विषय क्र.३५ **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर झालेले अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा हे पद भरणेकामी यापूर्वी जाहिरात प्रसिध्द करण्यात आले असून योग्य उमेद्वार न मिळाल्याने सदर पदभरती होऊ शकली नसल्याने सदर पद रिक्त आहे.

योग्य उमेद्वार न मिळाल्याने रिक्त असलेल्या अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत व दैनिक संचार या वर्तमानपत्राच्या दि.०७/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि. ०८/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.०६/०७/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ).

| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर सर्वानुमते प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |
|---|---|

विषय क्र.३६ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या कुलसचिव या पदावर कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. विकास भा. घुटे यांनी कुलसचिव या पदाचा राजीनामा सादर केल्याने त्यांना दि. ०१/१२/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये कुलसचिव या पदावरुन कार्यमुक्त करण्यात आल्याने कुलसचिव हे पद दि. ०१/१२/२०२० पासून रिक्त आहे.

प्रा. डॉ. वि. भा. घुटे यांनी कुलसचिव या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या कुलसचिव या पदाची जाहिरात दैनिक लोकमत व दैनिक संचार या वर्तमानपत्राच्या दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि. ०८/०६/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.०६/०७/२०२२ रोजीच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन कुलसचिव या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने कुलसचिव पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ).

| ठराव : | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर सर्वानुमते डॉ. ह. कृ. आवताडे यांचे नामनिर्देशन करण्यात आले. |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.३७ अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांनी दि.१५ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभा बैठकीमध्ये सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या स्वायत्त महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांच्या गुणांची दखल घेवून विद्यापीठाचे सुवर्णपदक देण्यात यावे, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी: दि.१५ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांनी मांडलेल्या प्रस्तावावरील ठराव क्र. १० खालीलप्रमाणे आहे.

सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या स्वायत्त महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच त्याच्या गुणांची दखल घेवून विद्यापीठाचे सुवर्णपदक देण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठराव: सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी व पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातांकामधून सुवर्ण पदकाचा विजेता/मानकरी निश्चित करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावली अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

या नियमावलीमध्ये स्वायत्त महाविद्यालयांच्या पदवी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करून सुवर्णपदकासाठी ग्राहय धरणेबाबत तरतूद दिसून येत नाही. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Autonomous Colleges During the XII Plan Period (2012 to 2017) यामधील मार्गदर्शक सूचनेमध्ये देखील स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करून सुवर्णपदकासाठी ग्राहय धरणेबाबत तरतूद दिसून येत नाही.

सबब, अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांनी दि.१५ मार्च, २०२२ रोजीच्या अधिसभा बैठकीमध्ये सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या स्वायत्त महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांच्या गुणांची दखल घेवून विद्यापीठाचे सुवर्णपदक देण्यात यावे, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| ठराव : | सदरचा विषय सध्या अमान्य करण्यात आला. विद्यार्थी हित लक्षात घेता इतर विद्यापीठातून माहिती घेऊन फेरविचार करावा असे ठरले. |
|---|---|

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

विषय क्र.३८ M.A (Yoga) या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क रु. २,०९०/- (दोन हजार नव्वद रुपये फक्त) परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विज्ञान विद्याशाखांतर्गत M.A. (Yoga) हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेले आहेत.

M.A. (Yoga) हा अभ्यासक्रम Faculty of Science & Technology च्या ऐवजी Faculty of Interdisciplinary Studies अंतर्गत समावेश असल्यामुळे परीक्षा शुल्क रु. २०९०/- असे आकारण्यास परीक्षा व मुल्यमापन मंडळाने सुर्वानुमते स्विकारून व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

सबब, M.A. (Yoga) या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क (रु. २०९०/-) परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारून व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | M.A (Yoga) या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क रु. २,०९०/- (दोन हजार नव्वद रुपये फक्त) असे आकारण्याची परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.३९ राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नियमित कार्यक्रम अनुदान वितरण रक्कमेवरील दंड आकारण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम खर्चासंबंधी नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीमधील पान क्र.६ मधील अनुक्रमांक १३ मध्ये विद्यापीठाने केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी करणेकरिता पाठविलेल्या पत्रानुसार दिलेल्या तारखेस, दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळेत लेखा परिक्षण करणे बंधनकारक आहे. दिलेल्या मुदतीत लेखापरीक्षण न केल्यास महाविद्यालयास वितरीत करण्यात आलेल्या एकूण रक्कमेवर १०% प्रमाणे दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी असा नियम करण्यात आला आहे.

सबब, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नियमित कार्यक्रम अनुदान वितरण रक्कमेवरील दंड आकारण्याची बाब विचारार्थ).

| ठराव : | राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयास वितरीत करण्यात आलेल्या एकूण रक्कमेवर, नियमित कार्यक्रम अनुदान रक्कमेचे दिलेल्या मुदतीत लेखापरीक्षण न केल्यास, १०% प्रमाणे दंड आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
|---|---|

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.४० डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना उपकेंद्र सुरु करण्याकरिता विद्यापीठ परिसरातील इमारतीमध्ये १५०० ते २००० चौ. फूट वापरण्या योग्य जागा तात्पुरत्या स्वरूपात भाडे पट्टाद्वारे देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे ता. माणगाव जि. रायगड यांनी पत्र क्र. डॉबाआंतंवि/कुलसचिव/जमीन/२०२२/११७ दि.११/०४/२०२२ अन्वये दि.०८/०४/२०२२ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिलेल्या निर्देशानुसार व दूरध्वनीवरून झालेल्या संभाषनानुसार या विद्यापीठाचे उपकेंद्र, सोलापूर या ठिकाणी सुरु करण्याकरीता विद्यापीठाच्या परिसरात १५०० ते २००० चौ. फूट वापरण्या योग्य जागा उपलब्ध करून द्यावी. त्या जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार विद्यापीठ देण्यास तयार आहे असे कळविले आहे.

कुलसचिव, डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांनी यापूर्वी केलेल्या विनंतीअन्वये विद्यापीठ कार्यालयाकडील दि.२४ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये ग्रंथालय इमारतीमधील उपलब्ध जागेमध्ये मा. कुलगुरू कार्यालय, परीक्षा विभाग, शैक्षणिक संशोधन आणि विकास, कुलसचिव कार्यालय व वित्त व लेखा कार्यालय व विविध प्रशासकीय कार्यालये कार्यरत असून जागेची कमतरता असल्याने जागा उपलब्ध करून देता येणार नाही असे कळविले आहे.

तद्नंतर त्यांनी दि.०८/०४/२०२२ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार व दूरध्वनीवरून झालेल्या संभाषनानुसार या विद्यापीठाचे उपकेंद्र सोलापूर या ठिकाणी सुरु करण्याकरीता विद्यापीठाच्या परिसरात १५०० ते २००० चौ. फूट वापरण्यायोग्य जागा उपलब्ध करून द्यावी असे कळविले आहे.

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय मुंबई येथील दि. १७/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित करण्यात आलेली विभागीय कार्यालये व उपकेंद्रे कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यकतेनुसार इमारती भाडेतत्त्वारवर घेण्यास तथा आवश्यक सेवा निर्माण करण्यास तथा त्यासाठी रूपये १५ कोटीच्या निधीस शासनाने मंजूरी दिली आहे.

(ड) स्थावर मालमत्तेची विक्री किंवा भाडेपट्टा याद्वारे, हस्तांतरण करणार नाही;

सबब, डॉ बाबासाहेब आंबेडकर तत्रंशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना उपकेंद्र सुरु करण्याकरीता विद्यापीठ परिसरातील इमारतीमध्ये १५०० ते २००० चौ. फूट वापरण्या योग्य जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडे पट्टाद्वारे देण्याची बाब विचारार्थ).

| ठराव : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना उपकेंद्र सुरु करण्याकरिता विद्यापीठ परिसरातील इमारतीमध्ये १५०० ते २००० चौ. फूट वापरण्या योग्य जागा तात्पुरत्या स्वरूपात भाडे पट्टाद्वारे देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच भाडे ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना देण्यात आले. |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

विषय क्र.४१ दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि. ०७/०६/२०२२ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिसरतील S. ३३९ (F) नुसार दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांत विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | दि. ०७/०६/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.४२ राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना मान्यता दिलेले हे अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र अंतर्गत सुरु करण्याची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना ६ महिने व १ वर्षाच्या सर्टिफिकेट व डिप्लोमा अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. सदरील अभ्यासक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र अंतर्गत सुरु करण्याबाबत महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत. संस्थांनी प्रस्तावासमवेत सादर केलेल्या कोर्सचे अभ्यासक्रम यामध्ये सुसूत्रता नसल्याने दि.०१/०१/२०२१ रोजीच्या टिपणीनुसार राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत मान्यता दिलेल्या सर्व अभ्यासक्रमाची रचना करण्याकरिता समन्वयक, कौशल्य विकास केंद्र यांच्या अधिकारात विषय निहाय अभ्यासक्रम उपसमिती नेमण्यास मा. कुलगुरु यांनी मान्यता दिली होती. प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावावर विहित पध्दतीने कार्यवाही करुन सदरचे ३० अभ्यासक्रमांपैकी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे नव्याने तयार करण्यात आलेल्या १९ अभ्यासक्रमांना संलग्नित महाविद्यालयात सुरु करण्याची बाब विद्यापरिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात आली असता, विद्यापरिषदेच्या दि.२७ जून, २०२२ च्या कौशल्य विकास केंद्रचा विषय क्र. (११) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात, राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत मान्यता दिलेले सदर अभ्यासक्रम, विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रांतर्गत सुरू करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१) (च) नुसार सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना मान्यता दिलेले हे अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र अंतर्गत सुरु करण्याची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | राष्ट्रीय कौशल्य गुणवत्ता आराखडा (NSQF) अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना मान्यता दिलेले हे अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र अंतर्गत सुरु करण्याची विद्यापरिषदेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.४३ विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तद्नुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Courses/Programmes) शासनाकडे कंत्राटी शिक्षकीय पदांची मागणी करणेसंदर्भात सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांनी दिलेल्या मान्यतेनुसार खालील अभ्यासक्रम (Courses/Programmes) सुरु करणेसंदर्भात शासनाची मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव पाठविण्यात आले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. विभागीय सहसंचालक, उ.शि. सोलापूर आणि मा. संचालक उ.शि. पुणे यांनी विविध अभ्यासक्रमांना शासनाची मान्यता मिळणेबाबत सोबत जोडलेल्या पत्रानुसार शासनास तत्कालिन परिस्थितीत शिफारस केली आहे. त्या सर्व पत्रांच्या छायांकित प्रती आणि सक्षम प्राधिकरणांच्या ठरावांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

सोलापूर भाग महाराष्ट्रात अवर्षणग्रस्त दुष्काळी पट्टा म्हणून ओळखला जातो. येथील पर्जन्यमान इतर जिल्हयांच्या दृष्टीने अत्यंत अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे येथील शेतकरी वर्ग आर्थिकदृष्टया मागास व गरीब आहे. या भागात उच्च शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी शेतकऱ्यांची पाल्ये आहेत. त्यांना इतर विद्यापीठात जाऊन पदव्यूत्तर शिक्षण घेणे आर्थिकदृष्टया परवडणारे नाही. या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या पाल्यांना दर्जेदार उच्च शिक्षण उपलब्ध करुन देणे हे या विद्यापीठाचे कर्तव्यच आहे. हे उदात्त हेतू समोर ठेवून विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये खालील अभ्यासक्रम (Courses/Programmes) सुरु केले आहेत. त्याचे विवरण खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | संकुलाचे नाव | विद्यापरिषद / व्यवस्थापन परिषदेचा विषय क्रमांक व दिनांक | संकुलात कार्यरत अधि विभाग | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या (सन २०२१-२२) | आठवड याचा कार्यभार | कार्यभारानुसार लागणारी शिक्षकीय पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रसायनशास्त्र संकुल (School of Chemical Sciences) | वि. प. दि. २०/०८/२०१९ विषय क्र. २० व्य. प. दि. १९/०९/२०१९ विषय क्र. ११(३) | M.Sc. Medicinal Chemistry | 20+20=40 | 23+20=43 | 112 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| २) | पदार्थविज्ञान संकुल (School of Physical Sciences) | वि. प. दि. २०/०८/२०१९ विषय क्र. १९ व्य. प. दि. १९/०९/२०१९ विषय क्र. ११(४) | i) M.Sc. Physics (Condensed Matter Physics) | 20+20=40 | 15+13=28 | 112 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | वि. प. दि. ३०/१२/२०२० विषय क्र. १४ व्य. प. दि. १५/०२/२०२१ विषय क्र. ५ | ii) M.Sc. Physics (Energy Studies) | 20+20=40 | 12+ | 112 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| ३) | संगणकशास्त्र संकुल (School of Computational Sciences) | वि. प. दि. ३०/०९/२०१९ विषय क्र. ५९(५) व्य. प. दि. ०६/१२/२०१८ विषय क्र. २१ | i) M.Sc. Biostatistics | 20+20=40 | 6+10=16 | 64 | प्राध्यापक-० सहयोगी प्राध्यापक-१ सहायक प्राध्यापक-३ एकूण - ४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | सामाजिक शास्त्रे संकुल (School of Social Sciences) | महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन आदेश क्र. एनजीसी २०१८/(३२२/१८)/ मशि-४ दि. ४ मार्च, २०२० कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता. | i) B.Voc. | 50+50+50=150 | 30+24+13=67 | 72 | प्राध्यापक-० सहयोगी प्राध्यापक-१ सहायक प्राध्यापक-३ एकूण - ४ |
| ४) | सामाजिक शास्त्रे संकुल (School of Social Sciences) | वि. प. दि. ३०/१०/२०२१ विषय क्र. ४९(१०) व्य. प. दि. २६/११/२०२१ विषय क्र. २२(२) | ii) M.A. History | 24+24=48 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९० कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-१ सहायक प्राध्यापक-२ एकूण - ४ |
| | | | iii) M.A. Political Science | 24+24=48 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९० कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-१ सहायक प्राध्यापक-२ एकूण - ४ |
| | | | iv) M.A. Public Administration | 24+24=48 | | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-१ सहायक प्राध्यापक-२ एकूण - ४ |
| | | | v) L.L.M. | 30+30=60 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९६ कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | वि. प. दि. ३०/१०/२०२१ विषय क्र. ४९(१०) व्य. प. दि. २६/११/२०२१ विषय क्र. २२(२) | vi) M.Lib. | 24+24=48 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९६ कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-६ एकूण - ९ |
| | | | vii) B.Lib. | 24 x 3=72 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान १२० कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | |
| | | | viii) M.S.W. | 24+24=48 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९६ कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-६ एकूण - ९ |
| | | | ix) B.S.W. | 24 x 3=72 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान १२० कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | |
| | | वि. प. दि. ३१/१२/२०२१ विषय क्र. २३ व्य. प. दि. १५/०२/२०२२ विषय क्र. ७ | x) M.P.Ed. | 30+30=60 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९६ कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५) | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (School of Commerce & Management) | वि. प. दि. २६/०४/२०११ विषय क्र. ११ व्य. प. दि. १७/०३/२०११ विषय क्र. १३ | i) M.Com. (Accountancy / Banking) | 90+90=180 | 92+88= 180 40+30= 70 70+180= 250 | 120 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टिईएम-२००५/ (२५१/०५)तांशि-१ दि. ३० जून, २००५ २) All India Council for Technical Education, New Delhi यांचे पत्र क्र. F.No. Western/1-4625913822/2019/ EOA दि. २५ एप्रिल, २०१९ अन्वये कायम अनुदानित तत्वावर मान्यता. | ii) M.B.A. | 120+120= 240 | 138+63= 201 | 296 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक--६ एकूण - ९ |
| ६) | भाषा व वाङ्मय संकुल (School of Languages & Literature) | वि. प. दि. २९/१०/२०१८ विषय क्र. ५३ व्य. प. दि. ०३/०७/२०१८ विषय क्र. १३ | i) M.A. Marathi | 24+24=48 | 23+26= 49 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | ii) M.A. Hindi | 24+24=48 | 13+20= 33 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | iii) M.A. English | 24+24=48 | 16+25= 41 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | iv) M.A. Sanskrit | 24+24=48 | 18+23= 41 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | v) M.A. Urdu | 24+24=48 | 16+23= 39 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | वि. प. दि. २०/०८/२०१९ विषय क्र. २१ व्य. प. दि. १९/०९/२०१९ विषय क्र. ११(२) | vi) M.A. Kannada | 24+24=48 | 20+18= 38 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | vii) M.A. Pali | 24+24=48 | 11+20= 31 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | viii) M.A. Prakrit | 24+24=48 | 15+22= 37 | 110 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७) | तंत्रज्ञान संकुल (School of Technology) | वि. प. दि. २९/१०/२०१८ विषय क्र. ५५ व्य. प. दि. ०३/०७/२०१८ विषय क्र. ३(१) व्य. प. दि. ०६/१२/२०१८ विषय क्र. २३ | Five Year Integrated M.Tech. Course in Cosmetic Technology | 30 x 5=150 | 4+12+9+6=31 | 104 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| ८) | आरोग्य विज्ञान संकुल (School of Allied Health Science) | वि. प. दि. २९/१०/२०१८ विषय क्र. ४८ व्य. प. दि. ०६/१२/२०१८ विषय क्र. २१ | i) P.G. Diploma in Nutrition & Dietetics | 30 | 27 | 36 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | वि. प. दि. २४/०३/२०२१ विषय क्र. ३२(४) व्य. प. दि. ३१/०५/२०२१ विषय क्र. ७ | ii) M.A. Yoga | 30+30=60 | 30 | 80 | |
| ९) | ललितकला व कला संकुल (School of Arts & Performing Fine Arts) | वि. प. दि. २०/०८/२०१९ विषय क्र. १८ व्य. प. दि. १९/०९/२०१९ विषय क्र. ११(५) | i) M.A. Music (Vocal / Instrumental) | 20+20=40 | 18+24=42 | 96 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | ii) M.A. Music (Tabla/ Pakhvaj) | 20+20=40 | 11+10=21 | 96 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | iii) M.A. Dramatics | 20+20=40 | 4+2=6 | 96 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | वि. प. दि. ३०/१०/२०२१ विषय क्र. ४९(१०) व्य. प. दि. २६/११/२०२१ विषय क्र. २२(२) | iv) M.A. Visual Arts | 24+24=48 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान ९६ कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| १०) | जैवविज्ञान संकुल (School of Life Science) | व्य. प. दि.१३/०४/२०२० विषय क्र. ३ वि. प. दि. ०६/०६/२०२० विषय क्र. ६७(१७) वि.प. दि. १०/१०/२०२० विषय क्र. १ व्य.प. दि.२६/११/२०२० विषयक्र. ३ व्य. प. दि.०३/०३/२०२१ विषय क्र. ४ | M.Sc. Microbiology | 20+20=40 | 25+22=47 | 112 | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११) | Constituent UG College (Arts, Science & Commerce) | वि. प. दि. ३०/१०/२०२१ विषय क्र. ४९(१०) व्य. प. दि. २६/११/२०२१ विषय क्र. २२(२) | i) B.A. Liberal Arts | 80 x 4=320 | शै. व. २०२२-२३ पासून सुरु करण्यात येणार आहे. किमान १२० कार्यभार गृहीत धरुन शिक्षक मागणी करण्यात येत आहे. | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | ii) B.Sc. Liberal Science | 80 x 4=320 | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| | | | iii) B.Com. Liberal Commerce | 80 x 4=320 | | प्राध्यापक-१ सहयोगी प्राध्यापक-२ सहायक प्राध्यापक-४ एकूण - ७ |
| **एकूण** | **११** | | **अधिविभाग - 35** | **3026** | ११३० (शै. व. २०२२-२३ मध्ये सुरु होणारे अभ्यासक्रम वगळता प्रवेशित विद्यार्थी संख्या) 34 08 | **प्राध्यापक - ३० सहयोगी प्राध्यापक - ५९ सहायक प्राध्यापक - १२६ एकूण - २१५** |

शासनाने मान्यता न दिल्यामुळे विद्यापीठाने उपरोक्त अभ्यासक्रम सध्यस्थितीत विद्यापीठाच्या सामान्य निधीतून Walk-in-Interview द्वारे निव्वळ तात्पुरती एका वर्षासाठी कंत्राटी शिक्षकीय पदे भरुन सुरु केले आहेत. परंतू विद्यापीठ उपरोक्त अधिविभागातील अभ्यासक्रम दीर्घ कालावधीसाठी शिक्षकांचा विद्यापीठाच्या सामान्य निधीतून माहे वेतन देऊन अभ्यासक्रम सुरु ठेवणे विद्यापीठास परवडणारे नाही. त्यामुळे सदर उपरोक्त शिक्षकीय पदे शासनाकडून कंत्राटी पध्दतीने मागणी करण्यासाठी सर्वकष प्रस्ताव पाठविणेकामी सदरचा विषय दि.२७/०६/२०२२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

"विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Courses/Programmes) शासनाकडे कंत्राटी शिक्षकीय पदांची मागणी करणेसंदर्भात सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तद्नुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Courses/Programmes) शासनाकडे कंत्राटी शिक्षकीय पदांची मागणी करणेसंदर्भात सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तद्नुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Courses/Programmes) शासनाकडे कंत्राटी शिक्षकीय पदांची मागणी करणेसंदर्भात सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

विषय क्र.४४ शासनाने यापूर्वी विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या ३७ शिक्षकीय पदांच्या व्यतिरिक्त, अधिकच्या कार्यभारानुसार रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल आणि सामाजिकशास्त्रे संकुल या ०५ संकुलाच्या १७ अधिविभागासाठी वाढीव पदे शासनास मागणी करणेसंदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र शासनाच्या दि. २२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रस्तुत विद्यापीठाची स्थापना झाली. सदर अधिसूचनेत मुद्दा क्र. ७ मध्ये नमूदप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्यूत्तर उपकेंद्रात कार्यरत असलेले २१ शिक्षकांची पदे नव्याने स्थापन झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडे दि. ०१ ऑगस्ट, २००४ पासून हस्तांतरित झाले.

तद्नंतर महाराष्ट्र शासनाचे क्र. एसयुएस २००५/(८०/०५)/विशि-५ दि. ११ मे, २००७ च्या पत्रान्वये नवनिर्मित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास १) गणित व संख्याशास्त्र आणि २) प्राचीन इतिहास संस्कृती व पुरातत्वशास्त्र असे ०२ नवीन विभागास एकूण १६ नवीन शैक्षणिक पदे निर्माण केल्याचे कळविले. महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. एसयुएस २००८/प्र.क्र.४४/०८/विशि-५ दि. २७ मार्च, २००८ अन्वये स्कूल सिस्टीम सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. संचालक, उ.शि. पुणे यांनी क्र. युएनआय/११२४/सो.वि./विशि-१ दि. २५/०४/२००८ अन्वये उक्त ०५ संकुलात एकूण १७ अधिविभागांचा उल्लेख करुन ०४ संकुलांसाठी प्राध्यापक -०१, सहयोगी प्राध्यापक -०२ आणि सहायक प्राध्यापक -०४ तर संगणकशास्त्र संकुलासाठी प्राध्यापक-०१, सहयोगी प्राध्यापक-०२ आणि सहायक प्राध्यापक-०६ अशी एकूण ३७ शिक्षकीय पदांचा आकृतीबंध विद्यापीठास कळविला आहे.

मा. संचालक, उ.शि. पुणे यांच्या कार्यालयात दि. ०६/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत मा. संचालक, उ.शि. पुणे यांचे दि. २५/०४/२००८ रोजीच्या पत्रानुसार आपणास मान्य केलेल्या ०५ संकुलातील अभ्यासक्रमांचे शासनाने तयार केलेल्या कार्यभाराच्या विहित नमून्यातच शिक्षक आकृतीबंध तयार करुन, तात्काळ दि. ०९/१२/२०२१ रोजी सर्व समर्थनानिशी सक्षम प्राधिकरणांच्या समोर सादरीकरण करावे असे आदेशित केले होते. याप्रमाणे मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये मा. प्र. कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली शासनामान्य अभ्यासक्रमांसाठी अनुदानित ०५ संकुलांच्या संचालकांची बैठक व्यवस्थापन परिषद कक्षात दि. ०७/१२/२०२१ रोजी दु. ३:०० वा. संपन्न झाली. सदर बैठकीत शासनाने दिलेल्या विहित नमून्यात कार्यभार मागवून सुधारित प्रस्ताव तयार करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानुसार ०५ संकुलांतील १७ अधिविभागांसाठी मंजूर असलेले शिक्षकीय पदे अत्यंत कमी असून, विहित नमून्यात कार्यभार दर्शवून अधिविभागनिहाय वाढीव शिक्षकीय पदांची मागणी संबंधित संकुलाच्या संचालकांनी केली आहे. त्याचे विवरण खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | संकुलाचे नाव | शासनाने मंजूर केलेली पदे | संकुलात कार्यरत विभाग | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या (सन २०२१-२२) | आठवडया चा कार्यभार | कार्यभारानुसार लागणारी शिक्षकीय पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रसायनशास्त्र संकुल (School of Chemical Sciences) | प्राध्यापक - १<br>सहयोगी प्राध्यापक - २<br>सहायक प्राध्यापक - ४<br>एकूण - ७ | i) Polymer Chemistry | 20+20 =40 | ४५ | १०६ | प्राध्यापक-०<br>सहयोगी प्राध्यापक-०<br>सहायक प्राध्यापक-०<br>एकूण - ० |
| | | | ii) Organic Chemistry | 40+40 =80 | ८८ | १६८ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-३<br>सहायक प्राध्यापक-७<br>एकूण - ११ |
| | | | iii) Industrial Chemistry | 25+25 =50 | ५२ | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-४<br>एकूण - ७ |
| २) | पदार्थविज्ञान संकुल (School of Physical Sciences) | प्राध्यापक - १<br>सहयोगी प्राध्यापक - २<br>सहायक प्राध्यापक - ४<br>एकूण - ७ | i) Applied Electronics | 20+20 =40 | ३६ | १६४ | प्राध्यापक-०<br>सहयोगी प्राध्यापक-०<br>सहायक प्राध्यापक-०<br>एकूण - ० |
| | | | ii) Applied Solid State Physics/ Material Science | 20+20 =40 | ४० | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-४<br>एकूण - ७ |
| | | | iii) Electronics | 20+20 =40 | ११ | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-४<br>एकूण - ७ |
| ३) | भूशास्त्र संकुल (School of Earth Sciences) | प्राध्यापक - १<br>सहयोगी प्राध्यापक - २<br>सहायक प्राध्यापक - ४<br>एकूण - ७ | i) Applied Geology | 20+20 =40 | २८ | १०६ | प्राध्यापक-०<br>सहयोगी प्राध्यापक-१<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ३ |
| | | | ii) Geoinformatics | 24+24 =48 | ३५ | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-४<br>एकूण - ७ |
| | | | iii) Environmental Science | 24+24 =48 | ४७ | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-१<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ४ |
| ४) | संगणकशास्त्र संकुल (School of Computational Sciences) | प्राध्यापक - १<br>सहयोगी प्राध्यापक - २<br>सहायक प्राध्यापक - ६<br>एकूण - ९ | i) Mathematics | 50+50 = 100 | ९२ | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-१<br>सहायक प्राध्यापक-३<br>एकूण - ५ |
| | | | ii) Statistics | 30+30 =60 | ५८ | १०६ | प्राध्यापक-०<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ४ |
| | | | iii) Computer Science | 30+30 =60 | ६० | १०६ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ५ |
| | | | iv) Master of Computer Applications | 60+60 +60 =180 | १५१ | 1:15 (Teachers : Student Ratio) 12:106 | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-१<br>सहायक प्राध्यापक-३<br>एकूण - ५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५) | सामाजिक शास्त्रे संकुल (School of Social Science) | प्राध्यापक - १ सहयोगी प्राध्यापक - २ सहायक प्राध्यापक - ४ एकूण - ७ | i) Ancient Indian History Culture & Archaeology | ४०+४०= ८० | ७६ | ९० | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-१<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ४ |
| | | | ii) Applied Economics | ३०+३०= ६० | ४८ | ९० | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-०<br>सहायक प्राध्यापक-३<br>एकूण - ४ |
| | | | iii) Rural Development | २४+२४= ४८ | ३३ | ७४ | प्राध्यापक-०<br>सहयोगी प्राध्यापक-०<br>सहायक प्राध्यापक-३<br>एकूण - ३ |
| | | | iv) Journalism & Mass Communication | ३०+३०=६० | ६१ | ८८ | प्राध्यापक-१<br>सहयोगी प्राध्यापक-२<br>सहायक प्राध्यापक-२<br>एकूण - ५ |
| एकूण | ०५ | प्राध्यापक - ०५ सहयोगी प्राध्यापक - १० सहायक प्राध्यापक - २२ एकूण - ३७ | अधिविभाग - १७ | १०१४ | १७७ | १८४० | प्राध्यापक - १२<br>सहयोगी प्राध्यापक - २२<br>सहायक प्राध्यापक - ४७<br>एकूण - ८१ |

शासनाने मंजूर केलेले, भरलेले व रिक्त शिक्षकीय पदांची माहिती :

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १) | प्राध्यापक | ०५ | ०१ | ०४ |
| २) | सहयोगी प्राध्यापक | १० | ०२ | ०८ |
| ३) | सहायक प्राध्यापक | २२ | १९ | ०३ |
| | एकूण | ३७ | २२ | १५ |

मा. संचालक, उ.शि. पुणे यांनी त्यांचे क्र. उशिसं/शिक्षकपदे/ सुधारित.आकृतीबंध/ वि.शि.१/२०२२/२३३४ दि. ०९ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रानुसार मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना उपरोक्त अतिरिक्त ८१ पदांपैकी ६७ शिक्षकीय पदांची शिफारस केली आहे. सदर शिफारशीनुसार शासनास प्रस्ताव पाठविणेकामी सदरचा विषय दि.२७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

"शासनाने यापूर्वी विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या ३७ शिक्षकीय पदांच्या व्यतिरिक्त, अधिकच्या कार्यभारानुसार रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल आणि सामाजिकशास्त्रे संकुल या ०५ संकुलाच्या १७ अधिविभागासाठी वाढीव पदे शासनास मागणी करणेसंदर्भात व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, शासनाने यापूर्वी विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या ३७ शिक्षकीय पदांच्या व्यतिरिक्त, अधिकच्या कार्यभारानुसार रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल आणि सामाजिकशास्त्रे संकुल या ०५ संकुलाच्या १७ अधिविभागासाठी वाढीव पदे शासनास मागणी करणेसंदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

| ठराव : | **शासनाने यापूर्वी विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या ३७ शिक्षकीय पदांच्या व्यतिरिक्त, अधिकच्या कार्यभारानुसार रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल आणि सामाजिकशास्त्रे संकुल या ०५ संकुलाच्या १७ अधिविभागासाठी वाढीव पदे शासनास मागणी करणेसंदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र.४५ **प्रस्तुत विद्यापीठाच्या १२ व्या बृहत आराखड्यात नमूद नुसार,विद्यापीठ परिसर संकुलात M. A. Applied Psychology पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) (च) मध्ये पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद नमूद आहे. तसेच प्रस्तूत विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभागाकडून तयार करण्यात आलेल्या १२ व्या बृहत आराखड्यात M. A. Applied Psychology विद्यापीठ परिसर संकुलात सुरु करण्यासंदर्भात नोंद घेण्यात आली आहे.

मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत येणाऱ्या मानसशास्त्र या अभ्यासमंडळाची बैठक दि.१०/०५/२०२१ रोजी ऑनलाईन प्रणालीद्वारे संपन्न झाली. सदर बैठकीत विषय क्र.४ वर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

"विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात P. G. मानसशास्त्र विभाग संगमेश्वर कॉलेज, सोलापूर या ठिकाणी आजपर्यंत चालविला जात होता. तथापि, सदर कॉलेज स्वायत्त झाल्यामूळे विद्यापीठात मानसशास्त्र पदव्युत्तर स्तरावर विभाग नाही. इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यापीठात मानसशास्त्र विषयाचा विभाग आवश्यक आहे. त्यासंदर्भात यापूर्वी विद्यापीठ स्थापनेपासून अनेकवेळा मागणी करण्यात आली. विद्यापीठाच्या १२ व्या बृहत आराखड्यातील विषयास मंजूरी मिळाली असून, विद्यापरिषदेत हा विषय मान्य करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी. त्याचप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासमंडळाने अभ्यासक्रमसुध्दा तयार केला आहे. केवळ पदव्युत्तर स्तरावर अभ्यासक्रम सुरु करणे बाकी आहे. वरील सर्व बाबींवर चर्चा होवून अभ्यासक्रम (मानसशास्त्र) पदव्युत्तर स्तरावर विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले." सूचक डॉ. सोपान मोहिते अनुमोदन डॉ. बी. ए. मेटील.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत कार्यालयाकडून दि.२४/०६/२०२१ रोजी सादरीकरण केले असता, सदर सादरीकरणावर मा. कुलगुरुमहोदयांनी "शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये M. A. Applied Psychology सुरु करण्यासंदर्भात विचार करता येईल" असे पृष्ठांकन केले आहे.

त्यानुषंगाने सदरचा विषय दि.२७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठाच्या १२ व्या बृहत आराखड्यात नमूद नुसार, विद्यापीठ परिसर संकुलात M. A. Applied Psychology पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या १२ व्या बृहत आराखड्यात नमूद नुसार,विद्यापीठ परिसर संकुलात M. A. Applied Psychology पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठाच्या १२ व्या बृहत आराखड्यात नमूद नुसार, विद्यापीठ परिसर संकुलात M. A. Applied Psychology पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१) (च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारून मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ३० निश्चित करण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र.४६ ललितकला व कला संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून M.A. in Visual Arts हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी: मा.प्र.संचालिका, ललितकला व कला संकुल यांनी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीसमवेत त्यांच्या संकुलाकडून दि.०४/०२/२०२२ रोजीच्या सादरीकरणात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून ललितकला व कला संकुलामध्ये M.A. in Visual Arts (पूर्वीच्या M.F.A.-UGC) च्या Guidelines नुसार हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस आहे. सदर अभ्यासक्रम J.J. College Arts, Mumbai, S.N.D.T. Women॰s University, Pune या ठिकाणी सुरु आहेत. तसेच M.A. in Visual Arts हा अभ्यासक्रम आपल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील ललितकला व कला संकुलात सुरु केल्यास आपल्या सोलापूर, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा खूप फायदा होईल, असे नमूद करण्यात आले आहे. सदर सादरीकरणास मा.कुलगुरु यांनी मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुषंगाने सदरचा विषय दि.२७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

"ललितकला व कला संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून M.A. in Visual Arts हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, ललितकला व कला संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून M.A. in Visual Arts हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव :** | **ललितकला व कला संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून M.A. in Visual Arts हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१) (च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| | |
|---|---|
| विषय क्र. ४७(१) | दि. १२/०७/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. |

(टिपणी: दि. १२/०७/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. यास General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.१२/०७/२०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, दि.१२/०७/२०२२ रोजी झालेल्या खरेदी सामितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | दि. १२/ ०७/२०२२ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

**विषय क्र. ४७(२)** **भौतिकशास्त्र संकुलाकडील नव्याने तयार करण्यात आलेल्या सभागृहास "Sir. C. V. Raman" असे नामकरण करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: भौतिकशास्त्र संकुलाकडे एकूण-८० आसनांची क्षमता असलेला एक नव्याने सभागृह तयार करण्यात आला आहे. सदरचा सभागृह RUSA व विद्यापीठाच्या फंडामधून तयार करण्यात आला आहे. परंतू संकुलाकडील नव्याने तयार करण्यात आलेल्या सभागृहाचे नामकरण करण्यात आले नसल्यामुळे, सभागृहाचे नामकरण करणे आवश्यक आहे.

सबब, भौतिकशास्त्र संकुलाकडील नव्याने तयार करण्यात आलेल्या सभागृहास "Sir. C. V. Raman" असे नामकरण करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **भौतिकशास्त्र संकुलाकडील नव्याने तयार करण्यात आलेल्या सभागृहास "Sir. C. V. Raman" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

विषय क्र. ४७(३) प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०१/०८/२०२२ पासून ३०/०६/२०२३ या कालावधीकरिता मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ.

(टिपणी: वित्त व लेखा (खरेदी व भांडार ) विभागानी दि.१४/०७/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीचा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. प्राप्त निविदापैकी न्युनतम दर असलेले फर्म मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक यांना निश्चित करण्यात आले आहे, असे नमूद करुन सदरचा प्रस्तावास मा. कुलगुरु यांची दि.१३/०७/२०२२ रोजी मान्यता घेवून आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह पुढील कार्यवाही करिता आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच संबंधित फर्मने दि.१४/०७/२०२२ रोजीच्या ईमेलने (पत्रान्वये) दराबाबत स्विकृती कळविली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु.०१.०० या दराने दि.०१/०८/२०२२ पासून ३०/०६/२०२३ या कालावधीकरिता मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०१/०८/२०२२ पासून ३०/०६/२०२३ या कालावधीकरिता मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

| | |
|---|---|
| विषय क्र. ४७(४) | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात B.Sc. Biological Sciences अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने मान्यता दिल्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३ (१) (च) नुसार विचारार्थ.** |

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१) (च) मध्ये पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद नमूद आहे.

त्यानुषंगाने प्र. संचालक, जैवविज्ञान संकुल, पुअहोसोविसो यांनी दि.१४/०७/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणी अन्वये, डॉ. लड्ढा यांनी सोबत मा. कुलगुरु यांची दि.१३/०७/२०२२ रोजीची मान्यता टिपणी अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणा-या सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता रोजगारभिमूख नवीन अभ्यासक्रम सुरु करणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तद्नुषंगिक तरतूरीनुसार विद्यापीठाचे कर्तव्य आहे, तसेच केंद्रशासनाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० शी अनुरुप नवीन अभ्यासक्रम सुरु करणे आणि या भागाचा विकास करणे आवश्यक आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून जैवविज्ञान संकुलात B.Sc. Biological Sciences अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics २० प्रवेश क्षमतेसह नवीन अभ्यासक्रम (New Program) सुरु करण्यास सदरचा विषय विद्यापरिषदेस व व्यवस्थापन परिषदेस ठेवण्याकरिता आस्थापना विभागास सादर केला असता, नजीकच्या काळात विद्यापरिषदेची प्रायोजित बैठक नसल्याने, सदरचे विषय प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु यांनी दि.१६/०७/२०२२ रोजीच्या सादरीकरणावर विद्यापरिषदेच्या वतीने १२(७) खाली मान्यता प्रदान केली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात B.Sc. Biological Sciences अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१) (च) नुसार विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात B.Sc. Biological Sciences अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३ (१) (च) नुसार, मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

| विषय क्र. ४७(५) | दि. २९/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे दि. २३/१०/१९९२ ते दि. ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त विगर नेट/सेट प्राध्यापकांच्या सेवानियुक्तीच्या दिनांकापासून धरुन सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आले आहेत. या संबंधी त्यांना नियुक्ती दिनांकापासून सेवा कायम करण्यास मान्यता देण्याबाबत डॉ. ह. कृ. आवताडे यांचे दि. १६/०७/२०२२ रोजी ई-मेलद्वारे प्राप्त पत्र विचारार्थ. |
|---|---|

(टिपणी: डॉ. ह. कृ. आवताडे यांचे ई-मेलद्वारे प्राप्त दि.१६/०७/२०२२ रोजीच्या पत्रानुसार दि.२९/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे दि.२३/१०/१९९२ ते दि.०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त विगर नेट/सेट प्राध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून धरुन सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आले आहेत. या संबंधी त्यांना नियुक्ती दिनांकापासून सेवा कायम करण्यास मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे.

सबब, दि.२९/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे दि.२३/१०/१९९२ ते दि.०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त विगर नेट/सेट प्राध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून धरुन सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आले आहेत. या संबंधी त्यांना नियुक्ती दिनांकापासून सेवा कायम करण्यास मान्यता देण्याबाबत डॉ. ह. कृ. आवताडे यांचे दि.१६/०७/२०२२ रोजी ई-मेलद्वारे प्राप्त पत्र विचारार्थ).

| ठराव : | महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे, शासन निर्णय क्रमांक : बैठक -२०२०/प्र.क्र. ५३/२०/विशि-१ दि. २९/१०/२०२१ अन्वये दि.२३/१०/१९९२ ते ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्यास, शासनाच्या मान्यतेच्या आधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
|---|---|

विषय क्र. ४७(६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ च्या तरतूदीनुसार तसेच विद्यापीठाने सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात स्वयंसाहाय्यित तत्वावर सुरु केलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Programmes) तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येणाऱ्या कंत्राटी सहायक प्राध्यापकांचे दरमहा एकत्रित वेतन सुधारित करणेची बाब विचारार्थ.

ठराव : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ च्या तरतूदीनुसार तसेच विद्यापीठाने सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात स्वयंसाहाय्यित तत्वावर सुरु केलेल्या अभ्यासक्रमांसाठी (Programmes) तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येणाऱ्या कंत्राटी सहायक प्राध्यापकांचे दरमहा एकत्रित वेतन खालीलप्रमाणे सुधारित करण्यास, तसेच शिक्षण शुल्क वाढीसाठी शुल्क समितीपुढे विषय ठेवून सकारात्मक निर्णय झाल्यानंतर, सदर सुधारित वेतन पुढील वर्षापासून (२०२३-२०२४) लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ. क्र. | तपशिल | सध्याचे एकत्रित वेतन | सुधारित एकत्रित वेतन |
|---|---|---|---|
| १) | NET/SET/GPAT/Ph.D. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे शिक्षक | रु. २२,०००/- | रु. ३०,०००/- |
| २) | NET/SET/GPAT/Ph.D. ही शैक्षणिक अर्हता धारण न करणारे शिक्षक | रु. १८,०००/- | रु. २५,०००/- |

| विषय क्र. ४७(७) | प्रस्तुत विद्यापीठामध्ये खाजगी कंत्राटदारामार्फत कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळामध्ये कंत्राटी पदनामास "कुशल" या प्रकारामध्ये वर्गिकरण करणेची बाब विचारार्थ. |
|---|---|

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठामध्ये खाजगी कंत्राटदारामार्फत कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळामध्ये दि. ०१/०८/२०२२ पासून खालील कंत्राटी पदनामास "कुशल" या प्रकारामध्ये वर्गिकरण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१) कंत्राटी वाहनचालक<br>२) संगणक लेखनिक इ. ज्यांचे राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. (जी. सी. सी.) व इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. (जी. सी. सी.) परीक्षा उत्तीर्ण तसेच महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT, परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. या सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. |

राष्ट्रगीतानंतर मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद